cmyk

## संपादकीय

### जुन्या पिढीने खुर्चीचा मोह सोडावा

पुढील वर्षी पंतप्रधान मोदी निवृत्त होत असल्याने भाजपने लोकसभा निवडणूक जिंकल्यास पुढचा पंतप्रधान कोण असेल असा सवाल केजरीवाल यांनी केला आहे. पंतप्रधान मोदी 'एक देश, एक नेता' अशी मोहीम राबवत असून ४ जून रोजी भाजपची सत्ता आल्यास विरोधी पक्षातील अनेक नेते तुरुंगात असतील तसेच भाजपमधील मोठे नेते राजकीय मंचावर दिसणार नाहीत. पुढील दोन महिन्यांत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बाजूला केले जाईल. सप्टेंबर २०२५ नंतर अमित शहा देशाचे पंतप्रधान होतील, असा खळबळजनक दावा केजरीवाल यांनी केला.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

## दहावी, बारावीचा निकालाबाबत अपडेट

पुणे- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या निकालाबाबत खूलासा केला असून बारावीचा निकाल मे महिन्याच्या तिसऱ्या तर दहावीचा निकाल हा जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. विद्यार्थी गेल्या कित्येक दिवसांपासून या निकालाची वाट पाहत आहेत. राज्यात यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२४ यादरम्यान पार पडली. त्यामुळे आता निकालाची वाट पाहिली जात आहे.


बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-३८ रविवार दि.१९ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

# पावसाळ्याची चाहूल..आज मान्सून अंदमानात

## शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी; हवामान खात्याची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

**नैऋत्य मान्सून पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, आग्नेय बंगालच्या उपसागराचा काही भाग आणि निकोबार बेटांवर दाखल होण्याची दाट शक्यता आहे. अशी मान्सून संदर्भातील महत्त्वाची अपडेट भारतीय हवामानशास्त्र विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या बुलेटीनमध्ये स्पष्ट केले आहे.**



नैऋत्य मान्सून रविवार १९ मे रोजी दक्षिण अंदमान समुद्र, आग्नेय बंगालच्या उपसागराचा काही भाग आणि निकोबार बेटांवर जाण्याची दाट शक्यता आहे. बुधवार २२ मे दरम्यान नैऋत्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता असून, हे क्षेत्र सुरुवातीला हळूहळू ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे. तर शुक्रवार २४ मेच्या सुमारास बंगालच्या उपसागराच्या मध्यवर्ती भागांवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे, असे देखील हवामानशास्त्र विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, भारतीय दक्षिण द्वीपकल्पीय प्रदेशातील बहुतांश राज्यात रविवार १९ मे ते मंगळवार ◀◀ पान २ वर

### नैऋत्य मान्सून 'या' तारखेला केरळमध्ये होणार दाखल

दक्षिण अंदमानच्या समुद्रात मान्सून दाखल होण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेहमीपेक्षा एक दिवस आधीच मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची अधिक शक्यता वर्तवली आहे. शुक्रवार ३१ मे रोजी केरळमध्ये मान्सूनचे आगमन होणार असल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली आहे.

# दगडफेक करून पेट्रोल टाकून घर जाळण्याचा प्रयत्न

## जमिनीच्या वादातून घडलेली घटना:६ जणा विरुद्ध गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शेतीच्या वादातून घरावर दगडफेक करत सदर घर पेट्रोल टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न केल्याच्या कारणा वरून अंबाजोगाई पोलिसात अर्जुन चंद्रशेखर थोरात व चंद्रशेखर ज्ञानोबा थोरात यांच्या सह अनोखी ४ जनांच्या विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या विषयी अंबाजोगाई शहरातील कुत्तर विहीर परिसरातील रहिवासी स्वाती अर्जुन काटे यांनी शहर पोलिसात दिलेल्या दिर्यादी मध्ये म्हंटले आहे की, आमच्यात व चंद्रशेखर ज्ञानोबा थोरात रा. अंबाजोगाई यांच्या मध्ये शेतीचा वाद कोर्टात सुरु आसून दि.१८ मे २०२४ रोजी रात्री मी सौ स्वाती काटे व जाऊ ज्ञानेश्वरी काटे, सासु कस्तुरबाई काटे, नंनद कल्पना बरीदे व मामस सासरे नागोराव बरीदे असे आमच्या स्लॅपच्या घरात झोपलो असतांना अंदाजे रात्री एक वाजण्याचे सुमारास आमच्या पत्र्याच्या घरावर कोणीतरी दगडफेक करीत असल्याचा आवाज आम्हास आल्याने आंम्ही झोपेतुन ऊठलोत, आंम्ही त्यांना कोन आहे ◀◀ पान २ वर

# परभणी-परळी दुहेरी रेल्वेमार्गाला गती

## भूमी अधिग्रहण करण्याची अधिसूचना जारी



**परळी । प्रतिनिधी**

**केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पात सन २०१०-११ मध्ये मंजुरी मिळालेल्या परभणी-परळी दुहेरीकरण रेल्वे मार्ग कामाला खऱ्या अर्थाने गती मिळाली असून या दुहेरीकरण मार्गासाठी जमीन आधिग्रहन करण्याची अधिसूचना रेल्वे मंत्रालयाने काढली आहे. या दुहेरीकरण मार्गासाठी एकूण ७७० करोड रुपये निधी मंजूर झाला असल्याने आगामी काळात या मार्गाचे दुहेरीकरण लवकर पूर्ण होणार आहे.**

दक्षिण मध्य रेल्वे विभागातील विविध मार्गावर दुहेरीकरण आणि विद्युतीकरणाची कामे जलदगतीने पूर्ण केली जात आहेत.परभणी जंक्शन येथून पूर्णा, जालना सोबतच परळीकडे जाणारा मार्ग आहे. परभणी-परळी या रेल्वे मार्गाचे एकूण अंतर ६४.७१ किलोमीटर एवढे आहे. परभणी-परळी या मार्गावर दररोज १५ ते २० रेल्वे गाड्या धावतात. या सोबतच परळी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी लागणाऱ्या कच्च्या कोळशाची मालगाडीद्वारे वाहतूक करण्यात येते.या मार्गावरील रेल्वेगाड्याची वर्दळ जास्त असल्याने अनेक वेळा परळी स्थानकापासून जवळच असलेल्या वडगाव निळा या ठिकाणी क्रॉसिंगमुळे तासनतास उभ्या असतात यामुळे या मार्गावर दुहेरीकरण करण्याची मागणी प्रवाशीवर्गातून वारंवार करण्यात आली होती. सन २०१०-११ च्या केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पामध्ये परभणी-परळी रेल्वे मार्गाचा ◀◀ पान २ वर

# चार जूनपासून जुमला पर्व संपणार

## उद्धव ठाकरे यांची खोचक टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीत भाजपाचा पराभव होणार हे निश्चित आहे. चार जूनपासून जुमला पर्व संपणार आहे, त्यामुळे ४ जून नंतर इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर जनतेच्या प्रश्नावर इंडिया आघाडी सरकार काम करणार असून बेरोजगारी, महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी निश्चित काम करणार आहोत. तसेच मुंबई आणि महाराष्ट्रातून जे काही लुटून नेले आहे ते सर्व परत दुपट्टीने महाराष्ट्राचे गतवैभव पुन्हा मिळवून देणार असल्याची ग्वाही उद्धव ठाकरे यांनी दिली. ◀◀ पान २ वर

# केंद्रीय कर्मचाऱ्यांना लॉटरी

## ५४ टक्के महागाई भत्ता, ८ वा वेतन आयोगसंदर्भात होणार विचार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांचा महागाई भत्त्यात वाढ होण्याची शक्यता आहे. जुलैच्या आधी महागाई भत्ता दर ५४ टक्क्यांवर पोहोचणार आहे. सध्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना ५० टक्के दराने महागाई भत्ता म्हणजेच डीए मिळतोय. महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांहून अधिक झाल्यावर सरकार आठव्या वेतन आयोगासंदर्भात गांभीर्याने विचार करेल असा नियम सांगतो. पण आतापर्यंत यासंदर्भात कोणती घोषणा झाली नाही.

केंद्रीय कर्मचाऱ्यांचा डीए सध्या ५० टक्के आहे. यामध्ये १ जुलैपासून ४ टक्के वाढ होईल. महागाई तर दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. एखाद्या महिन्यात ◀◀ पान २ वर

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या ४२ जणावर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या काळामध्ये व नंतर मतदान झाल्यावर सुद्धा सोशल मीडियावर आक्षेपरी पोस्ट टाकणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. अशाच प्रकारातून नांदूर घाट येते दंगल घडून याप्रकरणी तीन वेगवेगळे गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यामुळे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी सायबर सेल सक्रिय करून आतापर्यंत जिल्ह्यातील ४२ पोस्ट टाकणाऱ्या पोस्ट बहाद्दरांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकी दरम्यान दोन्ही गटाकडून मोठ्या प्रमाणात परस्परविरोधी आणि जातीय तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट टाकण्यात येत होत्या. केज तालुक्यातील नांदूर घाट येते अशाच एका पोस्टमुळे १५ मे रोजी दंगल घडली. ◀◀ पान २ वर

## संजय राऊत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर : सध्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. त्यातच आता शिवसेना प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. औरंगजेबाच्या जन्मस्थळाचा दाखल देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भाषणात एकेरी उल्लेख केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहमदनगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तिरुमला उद्योगसमूहाचे सुरेश कुटेंच्या विरोधात गुन्हा

## माजलगावात दोन गुन्हे नोंद; ठेवीदारांमध्ये संताप

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीडच्या तिरूमला उद्योगसमूहाचे प्रमुख सुरेश कुटेंच्या अडचणीत वाढ झाली आहे. एकीकडे ज्ञानराधा मल्टिस्टेट बँकेने २१ मे पासून ठेवीदारांच्या ठेवी परत देण्याचे आश्वासन दिले आहे तर दुसरीकडे आज ज्ञानराधावर माजलगावमध्ये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे.



यामध्ये एका गुन्ह्यात ३ लाख ८० रुपयांची फसवणूक तर दुसऱ्या गुन्ह्यात १ लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी सुरेश कुटे यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तिरूमला उद्योग समूह याच मल्टीस्टेट बँकेत पैसे अडकल्यामुळे अडचणीत सापडला आहे. तर हक्काच्या ठेवी मिळत नसल्याने ठेवीदार संतापला आहे.

गेल्या सात महिन्यांपासून ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेमध्ये कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत आणि हजारो ठेवीदार गेल्या सात महिन्यांपासून ठेवी परत मिळतील या आशेवर आहेत. आज माजलगाव शहर पोलीस ठाण्यामध्ये सुरेश कुटे यांनी फसवणूक केल्याप्रकरणी दोन ठेवीदारांनी वेगवेगळे दोन गुन्हे नोंद केले आहेत. यामध्ये तीन लाख ८० हजार रुपये हा पहिला गुन्हा तर ◀◀ पान २ वर

### तिरुमला ग्रुप अडचणीत येण्यास हे ठरले कारण

बीड येथील तिरुमला उद्योग समूहाच्या कार्यालयावर आयकर विभागाने १० ऑक्टोबर २०२३ रोजी धाडी टाकल्या होत्या. तिरूमला उद्योग समूहाच्या विविध पाच शहरातील कार्यालयावर या धाडी टाकण्यात आल्या होत्या. बीड, पुणे, सोलापूर, फलटण, औंगाबादमधील तिरूमला उद्योग समूहाच्या कार्यालयांवर आयकर विभागाने कारवाई करत अनेक कागदपत्रे जप्त केली होती. त्यानंतर कुटे यांनी भाजपात प्रवेश केला. मात्र त्यांच्या अडचणी कमी होण्याचे नाव घेत नाहीत.

# पाचव्या टप्प्यातील प्रचार तोफा थंडावल्या

## देशात ४९ तर महाराष्ट्रात १३ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानासाठी धडधडत असलेल्या प्रचार तोफा शनिवारी (दि.१८) सायंकाळी थंडावल्या. देशभरातील ८ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील एकूण ४९ तर महाराष्ट्रात १३ मतदारसंघांमध्ये सोमवार, २० मे रोजी मतदान होणार आहे. या मतदानातून काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्यासह केंद्रीय मंत्री पियुष गोयल, स्मृती इराणी, कपिल पाटील, भारती पवार यांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद होणार आहे. जम्मू काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला नशीब आजमावत आहेत.

पाचव्या टप्प्यात ◀◀ पान २ वर

### पाचव्या टप्प्यातील प्रमुख उमेदवार

काँग्रेस नेते राहुल गांधी- रायबरेली (उत्तर प्रदेश), केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह- लखनऊ (उत्तर प्रदेश), केंद्रीय मंत्री पियुष गोयल- मुंबई उत्तर (महाराष्ट्र), केंद्रीय मंत्री स्मृती इराणी- अमेठी (उत्तर प्रदेश), नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला- बारामुल्ला (जम्मू आणि काश्मीर).

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१८ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २१.५० क्विंटल | २,०६१ | २,८७१ | २,२९१ |
| ज्वारी/हायब्रिड : ७४.५० क्विंटल | १,५०० | ३,००० | २,४२१ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ३३.५० क्विंटल | ११,३०० | ११,६६० | ११,४९६ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: १८.५० क्विंटल | २,४०० | २,६१३ | २,५०६ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ७९.५० क्विंटल | ४,५०० | ४,५५० | ४,५३८ |
| हरभरा: ४.५० क्विंटल | ५,७०१ | ५,८३० | ५,७७६ |

# भाविकांसाठी खुशखबर! विठुरायाच्या चरणी नतमस्तक होता येणार

## २ जूनपासून चरणस्पर्श करता येणार; औसेकर महाराजांची माहिती

**पंढरपुर । प्रतिनिधी**

**येत्या २ जूनपासून श्री विठ्ठलाचे चरणस्पर्श दर्शन सुरु होणार आहे. याबाबतची माहिती विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे प्रमुख गहिनीनाथ औसेकर गेल्या अनेक दिवसांपासून मंदिराच्या गाभाऱ्याचे काम सुरु होते. त्यामुळे विठ्ठलाचे चरणस्पर्श दर्शन बंद होते. आता पुन्हा पूर्ववत दर्शन सुरु होणार आहे.**

गेल्या १५ मार्चपासून विठ्ठल रुक्मिणीचे चरण स्पर्श दर्शन बंद होते. कारण मंदिराच्या संवर्धनाचे काम सुरु आहे. हे काम पुढेही १७-१८ महिने हे काम सुरु राहणार आहे. पण मंदिराच्या गर्भगृहाचे व चार खांबाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे येत्या २ जूनपासून विठ्ठल मंदिर पूर्ववत पदस्पर्शाने सुरु करण्यात येणार असल्याची गहिनीनाथ औसेकर यांनी दिली आहे. २ जूनपासून ९ जूनपर्यंत ज्या राहिलेल्या कुटी पुजा आहेत, त्या सर्व देवाच्या पुजा होणार आहेत. देवाची तुळशी आणि पाद्य पुजा पर्ववत सुरु होणार असल्याची माहिती औसेकर महाराजांनी दिली.

### पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली काम सुरु

विठ्ठल मंदिरातील सोळखांबी, चौखांबी आणि गाभारा तसेच रुक्मिणी मातेचा गाभारा येथे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरु आहे. या भागात असणारे दगडी खांब पुरातत्व विभाग शास्त्रोक्त पद्धतीने साफ करीत असल्याने या नक्षीदार खांब, छत आणि फ्लोरिंग याचे मूळ दगडी आकर्षक वैभव दिसू लागले आहे.

### ७३ कोटीच्या आराखड्यातील कामे सध्या सुरु

**विठ्ठल मंदिर विकासासाठी सुरु असलेल्या ७३ कोटीच्या आराखड्यातील कामे सध्या सुरु आहेत. विठ्ठल मंदिराला पुरातन ७०० वर्षापूर्वीचे रूप येऊ लागले आहे. सध्या विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या गर्भगृहातील ग्रॅनाईट फरशी, फ्लोरिंग काढून टाकायचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण मंदिराला पुरातन काळातील दगडी फ्लोरिंग बसवण्यात येत आहे. मंदिरातील नंतरच्या काळात बसवण्यात आलेले मार्बल, ग्रॅनाईट आणि याच पद्धतीच्या चकचकीत फारशा काढून टाकण्यात येत असल्याने खऱ्या अर्थाने मंदिरातील पुरातन असणारा दगड आता मोकळा श्वास घेऊ लागला आहे.**



cmyk

अग्रलेख

# जुन्या पिढीने खुर्चीचा मोह सोडावा

पुढील वर्षी पंतप्रधान मोदी निवृत्त होत असल्याने भाजपने लोकसभा निवडणूक जिंकल्यास पुढचा पंतप्रधान कोण असेल असा सवाल केजरीवाल यांनी केला आहे. पंतप्रधान मोदी 'एक देश, एक नेता' अशी मोहीम राबवत असून ४ जून रोजी भाजपची सत्ता आल्यास विरोधी पक्षातील अनेक नेते तुरुंगात असतील तसेच भाजपमधील मोठे नेते राजकीय मंचावर दिसणार नाहीत. पुढील दोन महिन्यांत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बाजूला केले जाईल. सप्टेंबर २०२५ नंतर अमित शहा देशाचे पंतप्रधान होतील, असा खळबळजनक दावा केजरीवाल यांनी केला.

केजरीवाल म्हणाले, भाजप इंडिया आघाडीला विचारते की, तुमचा पंतप्रधान कोण होणार? मला भाजपला विचारायचे आहे की, तुमचा पंतप्रधान कोण होणार? १७ डिसेंबर रोजी पंतप्रधान मोदी ७५ वर्षांचे होतील. मोदी यांनी स्वत: २०१४ रोजी नियम लागू केला होता की, जो नेता ७५ वर्षांचा होईल तो निवृत्त होईल. त्यामुळे वयाची पंचाहत्तरी ओलांडल्यानंतर मोदी निवृत्त होणार का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. ते वयाच्या पंचाहत्तरीनंतर निवृत्त होणार नसतील तर 'वयम्? मोठम्? खोटम्' हेच सिद्ध होईल. केजरीवाल म्हणाले, मोदी निवृत्त होणार नसतील तर हा नियम फक्त अडवाणींसाठीच होता हे स्पष्ट करावे. मोदींनी वसुंधरा राजे, शिवराज सिंह चौहान, डॉ. रमण सिंह यासारख्या नेत्यांचे राजकारण संपुष्टात आणले. आता पुढील नंबर योगी आदित्यनाथ यांचा आहे. भाजप प्रामुख्याने मोदींचा चेहरा समोर ठेवून मते मागत असताना केजरीवालांच्या विधानामुळे दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश या उत्तरेतील महत्त्वाच्या राज्यांच्या मतदारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. यावर स्पष्टीकरण देताना भाजप नेत्यांची पुरती दमछाक होताना दिसते आहे. केजरीवालांच्या दाव्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना तातडीने खंडन करावे लागले. 'पंचाहत्तरी' पार केल्यानंतरही मोदीच पंतप्रधानपदी कायम राहतील असे त्यांनी जाहीर केले. मोदींच्या पंचाहत्तरीचा मुद्दा ऐरणीवर आणून केजरीवालांनी भाजपमधील पक्षांतर्गत स्पर्धेला खतपाणी घातल्याचे मानले जात आहे.

निकालाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या राजनाथसिंह, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ अशा अनेक कथित मोदीविरोधकांच्या महत्त्वाकांक्षेला केजरीवालांनी चुचकारल्याचे बोलले जात असून मोदी विरुद्ध शहा आणि शहा विरुद्ध अन्य नेते असा संघर्ष होण्याची शक्यताही त्यांनी अप्रत्यक्षपणे बोलून दाखविली आहे. 'एक देश, एक नेता' ही धोकादायक मोहीम असून त्याद्वारे देशातील सर्व नेत्यांना संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. विरोधकांना तुरुंगात टाकले जाईल तर भाजप नेत्यांचे राजकारण संपवले जाईल. मुरली मनोहर जोशी, लालकृष्ण अडवाणी यांना निवृत्त करण्यात आले तर रमण सिंह, शिवराज सिंह चौहान, वसुंधरा राजे, मनोहरलाल खट्टर यांचे राजकारण मोदींनी संपवले आहे. मात्र, अमित शहा म्हणतात, भाजपच्या घटनेत ७५ व्या वर्षी निवृत्त करण्याचा नियम नाही. भविष्यात देशाचे नेतृत्व पंतप्रधान मोदीच करतील. निवडणूक जिंकून मोदी तिस-यांदा पंतप्रधान होतील, असे स्पष्ट करत अमित शहा यांनी केजरीवाल यांचा दावा फेटाळून लावला. असे असले तरी याबाबत देशभर तीव्र संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राजकारण्यांच्या निवृत्तीबाबत खुद्द राजकारणातही वेगवेगळे मतप्रवाह आहेत. गत लोकसभा निवडणुकीच्या वेळी राहुल गांधी यांनी राजकारणात निवृत्ती असावी आणि ६० वर्षे हे राजकीय नेत्यांच्या निवृत्तीचे वय असावे असे म्हटले होते. भारतातील बहुतांश राजकारण्यांसाठी वय हा केवळ एक आकडा आहे.

परिस्थिती अतिशय प्रतिकूल झाल्याशिवाय ते राजकारण सोडत नाहीत. याच अनुषंगाने अजित पवार यांनी शरद पवार हे ८३ वर्षांचे आहेत, अशी खोचक टिप्पणी केली होती. अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांचे उदाहरण देताना हेच सुचवण्यात आले होते. याचाच अर्थ राजकारण्यांनाही याबाबत टोचणी लागलेली आहे. सरकारने नोकरशहांच्या निवृत्तीचे वय निश्चित केले आहे मग राजकारण्यांसाठी सेवानिवृत्तीचे वय का नाही, असा प्रश्न सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जातो. त्यामुळे आता नवभारताच्या निर्माणासाठी योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे. तरुणांना जास्तीत जास्त संधी देऊन वरिष्ठांनी त्यांच्यासाठी जागा रिकाम्या केल्या पाहिजेत आणि सल्लागार व मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली पाहिजे. प्रत्येक व्यवसाय आणि नोकरीत निवृत्तीचे वय निश्चित असले तरी राजकारण हे एकमेव असे क्षेत्र आहे की जिथे निवृत्तीच्या वयाला कोणतीही सीमा नाही. किंबहुना वाढते वय हीच तिथे मोठी पात्रता आहे. २०११ मधील जनगणनेच्या आकडेवारीनुसार जगात भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. राजकारणीसुद्धा आपल्या भाषणात हे आवर्जून सांगतात. सरकार सध्या धोरण आखताना युवा भारत डोळ्यासमोर ठेवून आपला प्राधान्यक्रम निश्चित करते. तरुण हे नेहमीच कोणत्याही प्रश्नाकडे पाहताना नव्या दृष्टीने विचार करतात. प्रश्न सोडवताना नवनवीन कल्पनांना प्राथमिकता देतात. राजकारणी माणसांचे अनुभव आणि ज्ञान पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. राजकारणी व्यक्ती जनतेसाठी कायदे बनवितात ते त्यांनासुद्धा लागू होतात. देशातील महत्त्वाच्या पदांवर वयोवृद्ध राजकारणी ठाण मांडून बसले आहेत, खुर्चीला चिकटून राहण्याच्या त्यांच्या मनोवृत्तीबाबत युवावर्गात खदखद आहे. वास्तव काय आहे हे जाणून न घेणारे वृद्ध नेतेच देशाच्या प्रगतीतील प्रमुख अडथळे आहेत, अशी युवावर्गाची भावना बनली आहे, ती दूर करावी लागेल. तरुण पिढी आणि ज्येष्ठांमध्ये उत्तम समन्वय निर्माण झाला पाहिजे. तरुणांनी ज्येष्ठांचा आदर केला पाहिजे, तरच राजकारण सशक्त होईल. दोन पिढ्यांनी हातात हात घालून काम केले पाहिजे अर्थात त्यासाठी जुन्या पिढीने खुर्चीचा मोह सोडायला हवा.

# स्क्रीन टाइमचे साइड इफेक्ट्स, शहरी मुलांमध्ये वाढतोय मायोपिया

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**सध्या वाढलेला स्क्रीनटाईम हा अनेक बाबतीत चिंतेचा विषय बनत आहे. आता तज्ज्ञांनी म्हटले आहे की, विशेषतः शहरी मुलांमध्ये डोळ्यांचा मायोपिया आजार वाढत चालल्याचे दिसून येते. ५ ते १५ वर्षे वयोगटातील शहरी मुलांमध्ये मायोपियाचे प्रमाण १९९९ मध्ये ४.४ टक्केवरून २०१९ मध्ये २१.१ टक्केपर्यंत वाढलं आहे. दरवर्षी ०.८ टक्केच्या प्रमाणानुसार शहरी मुलांमध्ये मायोपियाचे प्रमाण वाढेल. २०३० मध्ये ३१.८९ टक्के, २०४० मध्ये ४० टक्के आणि २०५० मध्ये ४८.१ टक्के. याचा अर्थ असा आहे की, भारतातील प्रत्येक दोन मुलांपैकी एक बालक येत्या २५ वर्षांत मायोपियाने ग्रस्त असेल.**

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, बैठी जीवनशैली, दिर्घकाळ स्क्रीनचा वापर आणि कमी बाह्य क्रियाकलाप यामुळे मुलांमध्ये मायोपियाच्या प्रकरणांमध्ये झपाट्याने वाढ होते आहे. या वाढत्या समस्येची मूळ कारणे बहुआयामी आहेत. स्क्रीनवरील अधिक वेळ मुलांच्या डोळे, रेटिना आणि मेंदूला उत्तेजित करतो. ज्यामुळे बुब्बुळाच्या जलद वाढीमुळे मायोपिक बदलांना गती मिळते. याव्यतिरिक्त घराबाहेर स्वच्छ सूर्यप्रकाशात फिरणे नसल्याने मुलांना डोळ्यांच्या निरोगी विकासासाठी आवश्यक असलेला नैसर्गिक प्रकाश मिळू शकत नाही. रुग्णांचा वयोगटही आता गेल्या काही वर्षांमध्ये बदलताना दिसून येतो आहे. डोळ्यांच्या तपासणीसाठी लहान मुले वारंवार येत असल्याचे दिसत आहे. त्यातील अधिकाधिक मुलांना मायोपिया असल्याचे दिसत आहे. २०१७ मध्ये मुंबईतील शहरी झोपडपट्टी भागातील ३-१५ वयोगटातील एक हजार मुलांचे सर्वेक्षण केल्यावर त्यापैकी २०० मुलांना मायोपिया असल्याचे आढळून आले. मुलांमध्ये मायोपियाची लक्षणे ओळखून वैद्यकीयदृष्ट्या झटपट हालचाल करणे महत्त्वाचे आहे. लक्षणांमध्ये अस्पष्ट दृष्टी, दूरच्या वस्तू पाहण्यात अडचण, डोळ्यांवरील ताण, डोकेदुखी आणि थकवा विशेषतः दिर्घकाळ स्क्रीन वापरल्यानंतर यांचा समावेश होतो. ही स्थिती बरी होऊ शकत नसली तरी चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्सच्या मदतीने फरक पडू शकतो. वयाच्या १९ वर्षांनंतर लेझर दृष्टी सुधारणा उपचारदेखील निवडला जाऊ शकतो. परंतु डोळ्यांची नियमित तपासणी करणे, स्क्रीनवरील वेळेचा समतोल राखण्यासाठी मुलांना घराबाहेर स्वच्छ सूर्यप्रकाशात क्रियाकलापांसाठी प्रोत्साहित करणे आणि मायोपियाची पुढील प्रगती मंदावण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने आय ड्रॉप्स किंवा मायोपिया कंट्रोल ग्लासेससारख्या वैद्यकीय उपायांचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

# आदित्य एल-१ ने कॅप्चर केला सूर्याचा नवीन व्हिडिओ



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**चांद्रयान-३ मोहिमेनंतर भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रो सातत्याने नवनवीन मोहिमा राबवत आहे. चांद्रयान-३ नंतर इस्रोने 'आदित्य एल-१' ही सूर्यमोहिम राबवली. 'आदित्य एल-वन' हे यान सध्या अंतराळातील लॅग्रेंज पॉईंट-१ (एल १) वर स्थिर असून, येथूनचे ते सूर्यासंदर्भातील महत्त्वाच्या अपडेट देत आहे. त्याने नुकताच सूर्याचा आकर्षक व्हिडिओ कॅप्चर केला आहे. या संदर्भातील माहिती इस्रोने पोस्टवरून शेअर केली आहे.**

इस्रोने टीपलेला सूर्याचा व्हिडिओ आणि छायाचित्र सोशल मीडिया हँडल एक्स वर शेअर केले आहे. ज्यावर माहिती देण्यात आली आहे की, हा सूर्याचा एक नवीन व्हिडिओ आहे. जो 'सोलर अल्ट्राव्हायोलेट इमेजिंग टेलिस्कोप'च्या मदतीने टिपला आहे, असे देखील इस्रोने स्पष्ट केले आहे. आदित्य एल १ हे भारताचे सूर्याकडे जाणारे पहिले मिशन आहे. जे २ सप्टेंबर रोजी इस्रोने लॉन्च केले होते. हे यान पृथ्वीपासून सुमारे १.५ दशलक्ष किमी दूर आहे. अलीकडेच आदित्य एल १ ने सूर्यावरील सर्वात मोठे सौर वादळ टिपले होते. हे सौर वादळ ११ मे रोजी २१ वर्षांनंतर आले होते, ज्याची छायाचित्रे आदित्य एल १ च्या मदतीने टिपण्यात आली होती.

## 'आदित्य एल-१' मिशनचा मुख्य उद्देश

इस्रोच्या म्हणण्यानुसार, सूर्याकडे यान पाठवण्याच्या आपल्या मोहिमेचा मुख्य उद्देश म्हणजे सूर्यमालेतील सूर्याचे तापमान, सूर्याच्या पृष्ठभागावर होत असलेल्या हालचाली आणि सूर्याच्या चमकण्याशी संबंधित क्रियाकलाप समजून घेणे. तसेच हवामानाशी संबंधित समस्या अभ्यासणे हा आदित्य एल-१ मिशनचा मुख्य उद्देश आहे.

## आज श्री क्षेत्र नेकनुर येथे गोवत्सल राधाकृष्ण महाराज यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचे भक्तिसूर्य श्री.गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवात आज दि १९ वार रविवार रोजी रात्री ९ ते ११ यां वेळेत तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प ह.भ.प. गोवत्सल राधाकृष्ण जी महाराज जोधपुर यांचे होणार आहे.तरी या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकट स्वामी महाराज संस्थान चे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## तांदळाचा ट्रक कारवर उलटला; कार दबून ४ जखमी

अकोला : राज्यात रस्ते वाहतूक अपघाताचे प्रमाण गेल्या काही महिन्यांत वाढले असून वेगाने गाडी चालवणे किंवा ओव्हरटेक करण्याच्या नादात हे अपघात होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. नुकतेच अकोला जिल्ह्यातही भीषण अपघाताची घटना घडली आहे. कार आणि तांदूळ वाहून नेत असलेल्या ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. एका चारचाकी कारची आणि ट्रकची धडक बसल्याचे दिसून येते. सुदैवाने अपघातात कुठलीही जिवीतहानी झाली नाही. पण, कारमधील चारही प्रवासी जखमी झाले असून कार व ट्रकचेही मोठे नुकसान झाले आहे.

## लाचखोर पीआय खाडेला स्थानिक गुन्हे शाखा पकडणार

**बीड । प्रतिनिधी**

**मल्टीस्टेट डबघाईस आल्यानंतर आर्थीक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी त्यात हात धुवून घेतले. गुन्हा दाखल झाल्यावर पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्या घरी एक कोटी पेक्षा घबाड मिळाले. खाडे फरार असून स्थानिक गुन्हे शाखा आता त्यास पकडणार आहे. खाडे आणि सहाय्यक फौजदार जाधवर यांना शोधण्यासाठी मदत करण्या बाबत पोलिस अधीक्षकांना एसीबीने पत्र दिले आहे. त्यानंतर ही जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवली आहे.**

जिजाऊ मल्टीस्टेटच्या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांनी १ कोटी रुपयांची लाच मागितली होती. सहायक फौजदार आर.बी.जाधवर याने त्याला प्रोत्साहन दिले होते. पहिला हप्ता ५ लाख रुपये घेताना कुशल जैन या खासगी व्यक्तीला पकडले होते. या प्रकरणात खाडे आणि जाधवर हे दोघेही फरार आहेत. त्यांच्या अटकेसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रयत्न सुरू केले आहेत. याच अनुषंगाने बीडच्या एसीबीने शनिवारी पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना पत्र देऊन खाडे आणि जाधवर यांना अटकेसाठी मदत करावी, अशी मागणी केली आहे. यावर अधीक्षक ठाकूर यांनी ही जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे दिली आहे. आता एलसीबीला यात किती यश येते? हे वेळच ठरवेल. तपासाच्या अनुषंगाने एलसीबी पोलिस निरीक्षक संतोष साबळे यांना विचारले असता, त्यांनीही याला दुजोरा दिला आहे. एसीबीचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांनी फोन न घेतल्याने त्यांची बाजू समजली नाही.

# दुष्काळाच्या झळा;ग्रामीण भागात टँकर सुरू

## प्रशासनाकडून पाणी पुरवठेची अचानक पाहणी

**परळी । प्रतिनिधी**

**मागील दोन-तीन महिन्यांपासून दुष्काळाच्या झळा गडद होत असून दिवसेंदिवस शहरासह ग्रामीण भागात पाणी टंचाई निर्माण होत आहे. अनेक गावात विहीरी व विंधनविहीरी अधिग्रहण केल्या आहेत तर काही ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरू केला टँकरची मागणी येताच तहसील आणि पंचायत समिती मार्फत तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.**

परळी शहर हे पाण्यावर उभे आहे. शहराला कधीच पाणी कमी पडत नाही अशी शहराची जुनी याख्यायिक होती मात्र जसजशी शहराची व्याप्ती आणि लोकसंख्या वाढत गेली तसेच काही वर्षांपासून सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे शहराला पाणी पुरवठा करणारे नागापुरचे वाण धरण दिवसेंदिवस कोरडे पडत गेल्याने शहरात नगरपालिकेच्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचे पाणी पुरवठा करण्यात अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.मागील तीन वर्षापुर्वी जो दुष्काळ पडला त्यावेळी शहरात विविध भागात विंधनविहीरी घेतल्या गेल्या. हजार ते बाराशेच्या आसपास विंधन विहिरी घेण्यात आला मात्र आजमितीस अनेक विंधन विहिरी कोरड्या पडल्या आहेत.परतीच्या पावसामुळे शहराला पाणी पुरवठा करणारे वाण धरण ७० टक्के भरले त्यावरच परळी शहराचा पाणी पुरवठा सुरू असून अद्याप तरी पाण्याचे मोठे दुर्भिक्ष शहरात पहावयास मिळाले नाही. परळी तालुक्यातील ग्रामीण भागात रामेवाडी, सिरसाळा, रेवली, लेंडेवाडी, जिरेवाडी, आचार्य टाकळी, पिंपरी बु, जळगव्हान व नागपिंपरी या ठिकाणी टँकर सुरू करण्याबाबत ग्रामस्थांनी मागणी केली असता तहसील प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करत रामेवाडी, सिरसाळा,रेवली आणि लेंडेवाडी या ठिकाणी टँकर सुरू केले असून उर्वरित




गावात टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली असून लवकरच टँकर सुरू करण्यात येतील असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.दरम्यान टँकरने पाणी पुरवठा होत असलेल्या गावात तहसील आणि पंचायत समितीच्या अधिकारी, कर्मचारी यांनी अचानक भेट देत टँकरद्वारे होत असलेला पाणी पुरवठा, पाण्याचा दर्जा आदींची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात तहसीलदार व्यंकटेश मुंडे, गट विकास अधिकारी नागरगोजे,नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांच्यासह संबंधित गावाचे तलाठी, ग्रामसेवक उपस्थित होते.

## पान १वरून...

### पावसाळ्याची चाहूल

२१ मे रोजी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. दक्षिणेतील तमिळनाडू आणि केरळमध्ये या दरम्यान अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.

---------

### परभणी-परळी दुहेरी

समावेश दुहेरीकरण कामासाठी केला होता. त्यानंतर प्रत्यक्षात कामासाठी निधी मिळाला नसल्याने हे काम अपूर्णच राहिले. सदरील काम पूर्ण करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी ७७० कोटी रुपये मंजूर झाल्याने या मार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाच्या दक्षिण मध्य रेल्वे विभागाकडून १५ एप्रिल २०२४ रोजी भूमी अधिग्रहण करण्याची अधिसूचना काढली आहे.या मार्गावरील जमिनीचे अधिग्रहण होऊन प्रत्यक्षात लवकरच कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

---------

### दगडफेक करून पेट्रोल

असा घरातुन आवाज दिला असता ते लोक, तुम्ही बाहेर या, तुम्हाला आज जाळून टाकतोत असे म्हणुन शिवीगाळ करीत होते आम्ही त्यांना कोन आहे असे म्हणत असतांना त्यातील एक जण हा, मी चंद्रशेखर थोराताचा मुलगा आहे असे म्हणत होता त्यावेळी गल्लीतील लाईट गेलेली होती त्यावेळी मी आमच्या घराच्या खिडकीतुन बाहेर पाहीले असता आमच्या ओळखीचे चंद्रशेखर ज्ञानोबा थोरात व त्याचा मुलगा अर्जुन चंद्रशेखर थोरात असे दिसले व बाकी त्यांच्या सोबत ईतर तिन-चार अनोळखी लोक होते रात्री लाईट गेल्यामुळे ते आंम्हाला दिसले नाहीत त्यांनी आमच्या घराला बाहेरुन कडी लावली आंम्ही सदर लोकांच्या भीतीपोटी घराच्या बाहेर निघालो नाहीत त्यावेळी त्यांनी आमच्या पत्र्याच्या घराच्या दरवाज्यावर पेट्रोल टाकून दरवाजा पेटवून दिला व सदर लोक निघुन गेले काही वेळाने गल्लीतील लोक जमा झाल्यानंतर त्यांनी आमच्या घराची कड़ी बाहेरुन ऊघडली व त्यानंतर आंम्ही बाहेर आलो असता आंम्हाला आमच्या पत्र्याच्या घराचा दरवाजा जळत असतांना दिसला त्यावर आंम्ही पाणी टाकुन विझवा विझव केली. या प्रकरणी स्वाती अर्जुन काटे यांच्या फिर्यादी वरून अर्जुन चंद्रशेखर थोरात, चंद्रशेखर ज्ञानोबा थोरात व अन्य अनोळखी ४ जनांच्या विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन मध्ये भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४३६, ३३६, ३४२, ५०४, १४३, १४७, १४८, १४९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पो नी विनोद घोळवे यांच्या मार्गदर्शना खाली पो हे कॉ हरिदास नागरगोजे हे अधिक तपास करत आहेत.

---------

### सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट

यात काहीजण जखमी झाले असून तीन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. असा प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दक्षता घेत सायबर सेल सक्रिय केला आहे. सायबर सेलच्या टीमची करडी नजर सोशल मीडियावर असून आतापर्यंत ४२ जणांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये आष्टी, युसुफ वडगाव, अंबाजोगाई ग्रामीण आणि शहर पोलीस ठाण्यास इतर पोलीस ठाण्याचा समावेश आहे.

----------

### केंद्रीय कर्मचाऱ्यांना

काही पॉइंट्सचे अंतर येते. पण जानेवारी २०२४ पासून ३० जून २०२४ चा चार्ट पाहिला तर त्या आधारे डीए किमान ४ टक्के वाढेल असा विश्वास स्टाफ साइडच्या राष्ट्रीय परिषदेचे सदस्य सी. श्रीकुमार यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी आठव्या वेतन आयोगाच्या समितीसंदर्भात महत्वाचे विधान केले.

--------------

### चार जूनपासून जुमला

महाराष्ट्रातील पाचव्या अर्थात शेवटच्या टप्प्यातील लोकसभा निवडणूकीसाठी २० मे २०२४ रोजी मतदान पार पडणार आहे. या पाचव्या टप्प्यासाठी शनिवारी संध्याकाळी प्रचाराची मुदत संपली. मुंबईत उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि नरेंद्र मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडत ४ जून पासून देशातील जुमला पर्व संपणार असून खऱ्या अर्थाने अच्छे दिनाची सुरवात होणार असल्याचे सांगितले. यावेळी उद्धव ठाकरे नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना म्हणाले की, मागील १० वर्षात देशात कोणती कामे केली याचे कोणतीही माहिती त्यांच्या हातात नाही. त्यामुळे सातत्याने त्यांच्या कडून हिंदू -मुस्लिमचा विषय काढला जात आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात १२ हून अधिक सभा मोदी यांना घ्याव्या लागल्या. महाराष्ट्रात येतात आणि मूळ पक्षाच्या नेत्यांनाच ते नकली म्हणतात. मग २०१९ साली माझ्याकडे येऊन युतीसाठी करण्यात आलेल्या करारपत्रावर सह्या घेतल्या त्यावेळी मी नकली नव्हतो काय असा खोचक सवालही यावेळी उपस्थित केला. तसेच महाराष्ट्रातून इंडिया आघाडीला किती जागा मिळणार या प्रश्नावर उद्धव ठाकरे म्हणाले की, ४८ च्या ४८ जागा महाविकास आघाडीला मिळणार आहेत. आता ही निवडणूक जनतेनेच हातात घेतली आहे, असे ते म्हणाले. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, काहीजण महाराष्ट्रात येऊन आम्हालाच नकली म्हणतात. त्यामुळे मी त्यांना बेअकली म्हणतो आणि जुमलेबाज म्हणतो अशी टीका नरेंद्र मोदी यांच्यावर केली.

**बोगस मतदानाची तक्रार करणार**

आतापर्यंत महाराष्ट्रात ज्या ठिकाणी मतदान झाले आहे त्या भागात बोगस मतदान करण्यासाठी भाजपावाल्याने त्या त्या भागातील लोकांकडून मतदान होण्याच्या आधीच निवडणूक आयोग जी शाई वापरते ती शाई लावण्यात आली आहे. यासंदर्भातील अनेक तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. त्या सर्व तक्रारी आम्ही निवडणूक आयोगाला दिल्या असल्याचे सांगत मतदानाची ती शाई निवडणूकीपूर्वी बाहेर कशी आली असा सवालही यावेळी उपस्थित केला.

**भाजप संघाला नष्ट करण्याच्या तयारीत**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा काही दिवसापूर्वी म्हणाले होते की देशात एकच पक्ष राहिल. आता त्यांनी एका इंग्रजी वर्तमानपत्राला दिलेल्या मुलाखतीत नड्डा म्हणतात भाजपा स्वयंपूर्ण झाला आहे आता त्यांना आरएसएसची गरज नाही. म्हणजे ज्यांनी राजकीय जन्म दिला त्या संघाला भाजपा नष्ट करायला निघाला आहे. आरएसएसला १०० वे वर्ष धोक्याचे असून भाजपा आरएसएसलाही नकली संघ म्हणू शकतो, आरएसएसवर बंदीही घालू शकतो असा टोलाही यावेळी त्यांनी लगावला.

----------------

### पाचव्या टप्प्यातील

महाराष्ट्रातील १३ मतदारसंघांसह उत्तर प्रदेश १४, बिहार ५, पश्चिम बंगाल ७, झारखंड ३, ओडिशा ५, जम्मू आणि काश्मीर १, लडाख १ अशा एकूण ४९ मतदारसंघात मतदान होणार आहे. महाराष्ट्रात मुंबईतील उत्तर, उत्तर-पश्चिम, उत्तर-पूर्व, उत्तर-मध्य, दक्षिण-मध्य आणि दक्षिण मुंबई मतदारसंघांसह ठाणे, कल्याण, पालघर, धुळे, दिंडोरी, नाशिक, भिवंडी या १३ मतदारसंघांमध्ये मतदान पार पडणार आहे. या सर्वच ठिकाणी महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारांसह अपक्षांनी प्रचारात चांगलाच जोर लावल्याचे बघायला मिळाले आहे.

-------

### तिरुमला उद्योगसमूहाच

दुसऱ्या गुन्ह्यात एक लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी दुसरा गुन्हा माजलगाव पोलीसात नोंद झाला आहे. हे दोन्ही गुन्हे नोंद झाल्यामुळे सुरेश कुटे यांच्या अडचणी वाढल्याचे दिसते.

----------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.१९ मे २०२४ ३

## भागवत कथेला पहिल्याच दिवशी अभूतपूर्व प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

संत बंकटस्वामी महाराज यांनी काकडा भजनाची विशेष उपासना पद्धती वारकरी सांप्रदायाला दिली. असे प्रतिपादन राष्ट्रिय भागवत कथा प्रवक्ते गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपूरकर यांनी केली.. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्यां पुण्यतिथी उत्सवात श्रीमद् भागवत कथेत ते बोलतं होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प किसन महाराज पवार, उध्दव बापू आपेगावकर यांच्या हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती.. पहिल्याच दिवशी कथा मंडप भाविकांनी हाऊसफुल्ल झाला. यावेळी विठ्ठला कधी येशील माझ्या घराला.. यां गीतावर कथा मंडपात भाविकांनी मंत्रमुग्ध झाले होते.. श्री क्षेत्र संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात जागतिक खात्याचे भागवत कथाकार गोवत्सल राधाकृष्ण महाराज यांच्या सुमधुरवाणी मधून भागवत कथेला सुरुवात झाली.. पहिल्याच दिवशी भागवत महात्म्य व नाम महात्म्य संगती महिमा, यावरती महाराजांनी सुंदर शब्दात विवेचन केले.. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी सांप्रदायात सेवा आणि काकडा हि विषेश उपासना पद्धती मधून देवाशी जोडता येत त्याची सोपी साधना सांगितली..स्वामी च्या दरबारात जेवढी सुंदर कथा होईल तेवढा विठ्ठल प्रसन्न होईल. असा विश्वास व्यक्त केला..संतावर प्रेम करतो तो देवाला मला आवडतो.देवाशी जोडण्याचां उत्तम काळ प्रातकाळ आहे.संत बंकट स्वामीच्या उपासनेची ऊर्जा अजही इथे पाहायला मिळते.. कथा ही ताप हरणारी पाप मुक्त करणारी देवाची प्राप्ती करून देणारी आहे.. कथेच्या सागरात प्रत्येकाने पवित्र स्नान करण्यासाठी यावे. असे महाराजांनी सांगितले. श्री कृष्णाची कथा जीवनाचा उध्दार करणारी आहे..

# अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

## गावपुढारी बेफिकीर; जबाबदार सरपंच,ग्रामसेवकांवर कारवाई करा –डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करण्याची जबाबदारी ग्रांमपंचायतची असुन पिण्याच्या पाण्याचे दररोज शुद्धीकरण करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत हद्दीत असणारे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत परीसर यांची नियमित साफसफाई करणे आवश्यक आहे. सध्या अवकाळी पाऊस व पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी दुषित होण्याची शक्यता आहे. पाणी गुणवत्ता व नियंत्रणाच्या कामात कोणताही हलगर्जीपणा न करता ग्रामस्थांना शुद्ध व सुरक्षित पाण्याचा पुरवठा करण्याचे पावसाळ्यात उत्तम दर्जाचे टी.सी.एल. प्रत्येक ग्रामपंचायतीत पुरेसा प्रमाणात उपलब्ध राहील याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आणि जलजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याचे जिल्हा प्रशासनाने दिलेले निर्देश गावपुढारी फाट्यावर मारताना दिसत असुन अशुद्ध पाणीपुरवठा होऊन गावांमध्ये जलजन्य आजारांची साथ पसरल्यास सरपंच आणि ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) जिल्हा परिषद बीड डॉ.ज्ञानोबा मोकाटे यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**शुद्धीकरण केंद्र शोभेची वस्तु; जारचे पाण्याने तहान भागवली जाते**

ग्रामीण भागात शासनाच्या विविध नावे बदलुन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येतात.एकाच गावात ३-३ पाणीपुरवठा राबवुनही गावे तहानलेलीच आहेत. ग्रामस्थांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जल शुद्धीकरण केंद्रावर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला मात्र बहुतांश गावातील जलशुद्धीकरण केंद्र धुळखात पडुन आहेत. व्यावसायिक आणि ग्रामस्थांना विकत जारचे पाणी घेऊन तहान भागवावी लागते त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन प्रशासन मात्र जाणिवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे दिसून येत आहे.



### पाणीटंचाईमुळे हागणदारी मुक्तीला खिळ

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अभियान अंतर्गत पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शौचालयाची कामे करण्यात आली आहेत.हगणदारीमुक्त गाव करण्यासाठी जनजागृती करून शौचालय बांधकामासाठी १२ हजार रूपयांचे अनुदान देण्यात आलेले आहे.बहुतांश गावांनी शंभर टक्के नागरीकांनी शौचालयाची कामे पूर्ण केल्याचा प्रशासनाचा दावा करत गावे पाणंद मुक्त झाल्याचा गवगवा करण्यात आला आहे.मात्र आता तिव्र पाणीटंचाई मुळे पाण्याअभावी शौचालयाचा वापर बंद असल्याने ग्रामस्थांनी पुन्हा लोटा घेऊन पांदीचा आधार घेतल्याचे दिसून येते त्यामुळे पाणीटंचाई मुळे हागणदारी मुक्तीला खिळ बसल्याचे दिसून येत आहे.



### जलजीवन योजना गावपुढारी आणि आधिका–यांसाठी भ्रष्टाचाराचे कुरण

बीड जिल्ह्यात कोट्यवधी रूपयांची केंद्र शासनाची जलजीवन योजना राबविण्यात आली.बहुतांश गावातील ग्रामस्थांनी या योजनेच्या बोगस कामाबाबत तक्रारी केल्या आणि चौकशी मध्ये बोगसपणा निष्पन्न सुद्धा झाला.अनेक गावातील गावपुढा–यांनी आधिका–यांशी संगनमत करून कागदावर योजना पूर्ण झाल्याचे दाखवुन निधीचा अपहार केला आणि ग्रामीण भागातील वाड्या वस्तीवरील ग्रामस्थांसाठी जीवदान ठरणारी जलजीवन योजना गावपुढारी आणि आधिका–यांसाठी भष्टाचाराचे कुरण ठरली. ग्रामस्थांनी पाण्यासाठी भटकंती सुरूच आहे.

### अशुद्ध पाण्यामुळे जलजन्य आजारांची साथ पसरण्याची भिती ; उपाययोजना आवश्यक

कडक उन्हाळा सुरू असुन पाण्याची पातळी झपाट्याने खालावली आहे.पाण्यासाठी वणवण सुरू असुन वातावरण बदलामुळे आणि अशुद्ध पाणी पिल्याने कॉलरा ,अतिसार ,गॅस्ट्रो, कावीळ ,विषमज्वर आदि जलजन्य आजारांची साथ पसरण्याची दाट शक्यता आहे. त्यासाठी नळ योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या पाईपलाईनची तपासणी वेळोवेळी करून गळती होत असल्यास थांबवावी, खड्डे असल्यास वेळोवेळी बुजविण्यात यावेत. गटारी,नाल्यातील सांडपाणी वाहण्याची ठिकाणे स्वच्छ करण्याची तसेच विहिर व हातपंपाच्या सभोवताली पाणी साचुन राहणार नाही तसेच विहिर,हातपंपाचे ओटे फुटलेले असल्यास त्याची त्वरित दुरुस्ती करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर आठवड्यातून एकदिवस कोरडा दिवस पाळावा, पाणी उकळून थंड करून प्यावे, विहीर आणि टाकीतील पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्याची आवश्यकता आहे.

## प्रसार माध्यमांच्या दणक्याने जाग येताच महावितरणने रोहित्र बसविले

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील ताकडगाव रोड येथे रोहित्र बसविण्यासाठी गेल्या एक महिन्यापूर्वी पोल उभे करूनही रोहित्र बसवली नाही. यामुळे महावितरणने नागरिकांना वेड्यात काढलं. अशा संदर्भातील वृत्त प्रकाशित होताच याची दखल महावितरणने घेतली आणि लगोलग रोहित्र बसवण्यात आला. याबद्दल महावितरणला धन्यवाद देण्यात येत आहेत. माहिती अशी की सदरील भागातल्या लोकांना कमी दाबाने विज पुरवठा होत होता असल्यामुळे लोकांनी आ. लक्ष्मण अण्णा पवार यांना विनंती केली तसे त्यांनी सदरील रोहित्र बसविण्याचे काम करण्याबाबत महावितरणला सुचित केले होते. त्यानुसार महिना भरापूर्वी रोहित्र टाकण्यासाठी खांब देखील उभे केले परंतु रोहित्र टाकलीस नाही महावितरण विभागाचे अधिकारी आणि गुत्तेदार यांनी लोकांना वेड्यात काढून जाणीवपूर्वक त्रास देतात की काय? अधिकाऱ्याच्या दुर्लक्ष मुळे जनतेचे हाल होत आहेत



## युवा मल्हार सेना महाराष्ट्र च्या सरसेनापतीपदी गणेश कोळेकर



**बीड । प्रतिनिधी**

युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष इंजीनियर विष्णू देवकते यांच्या आदेशाने युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य सरसेनापती पदी गणेश कोळेकर पाटील यांची निवड करण्यात आली युवा मल्हार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दादा देवकते व संस्थापक सचिव एडवोकेट राजू शिंदे यांच्या हस्ते यांना स्वाक्षरीत नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली श्री कोळेकर पाटील यांच्या निवडीचे महाराष्ट्र राज्यातून युवा मल्हार सेनेच्या पदाधिकारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले, यावेळी गणेश कोळेकर पाटील म्हणाले आहेत की युवा मल्हार सेनेचे कार्य राज्यभर ग्रामीण भागामध्ये पोहचवनार.

## मोहनराव जगताप यांच्याकडून गंगामसला येथील पिडीत सलून दुकानदारांना आर्थिक मदत

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील गंगामसला येथील बस स्थानक परिसरात असलेल्या नाभिक समाजाच्या चार सलून दुकान अज्ञातांनी रविवारी १२ मे च्या रात्री फोडल्याची घटना घडली. यामध्ये नाभिक समाजाच्या चारही दुकानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले या प्रकरणाची भारतीय जनता पार्टीचे नेते माजलगाव विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप यांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी भेट देऊन चारही दुकानदारांना धीर दिला व दुकानदारांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांना त्यांची दुकाने पुन्हा उभा करण्यासाठी आर्थिक मदत केली. तसेच इतरांनाही या गरीब दुकानदारांना मदत करण्याचे अवाहन केले. यावेळी गंगामसला येथील ज्येष्ठ नेते श्रीकृष्ण सोळंके, सरपंच भालचंद्र सोळंके, नाभीक समाजाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, बाबा दळवी, उपसरपंच अविनाश गोंडे,अँड गणेश गवळी यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.



## सरजुबाई भक्कड यांचे निधन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील आडत व्यापारी जवाहर भक्कड यांच्या मातोश्री श्रीमती सरजुबाई गंगाबिषण भक्कड यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले.प्रतिष्ठित उद्योजक लक्ष्मीनारायण मुंदडा यांच्या त्या जेष्ठ भगिनीं होत्या.



त्या धार्मिक वृत्तीच्या म्हणून सरजूबाई सर्वत्र परिचित होत्या.मागील काही काळापासून त्यांना तब्येत साथ देत नव्हती.दि १७ मे शुक्रवार रोजी दुपारी १२:०० वाजण्याच्या दरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा सत्यनारायण, जवाहर कपिल व नातवंडे असा मोठा परिवार आहे.राजस्थानी वैकुंठधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील व्यापारी, वकील, डॉक्टर उपस्थित होते.सरजू बाई भक्कड यांचा भक्कड व मुंदडा परिवाराचा उठावना राजस्थानी मंगल कार्यालय येथे दि १९ मे रोजी दुपारी ३:०० वाजता आहे.

## विटाने डोक्यात गंभीर मारहाण केल्याप्रकरणी आरोपीविरोधात दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

बांधकाम करणारा मिस्त्री हा माझ्या जिवावर गावात बांधकाम घेतो असं म्हणत बांधकामाच्या ढिगाऱ्यावरील विट काढून डोक्यात विट घालुन मशुराम कुंडलीक जाधव यास गंभीर जखमी केल्याची घटना तालुक्यातील मोगरा येथे दि १५ मे बुधवार रोजी घडली याप्रकरणी आरोपी विरोधात दि १७ मे शुक्रवार रोजी दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात दिंद्रुड पोलिस ठाण्यात फिर्यादी मशुराम कुंडलीक जाधव,रा.मोगरा,तामाजलगाव यांनी दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की, दि.१५ मे बुधवार रोजी सांयकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी घराचे बांधकाम करणारे मिस्त्री नामे शेख सादेक शेख जय दस्तगीर रा. माजलगाव याला माझे बाधंकाम तु दोन महीन्यात पूर्ण करतो असे म्हणून तु चार महीने झाले तरी तु माझे बांधकाम पुर्ण का केले नाही असे बोलत असताना मिस्त्रीनी आमच्या गावातील सुरेश रामभाऊ इंगळे रा शिवाजी नगर मोगरा ता. माजलगाव यांना बोलवुन घेतले असता सुरेश रामभाऊ इंगळे हे तेथे आला व फिर्यादीला म्हणाला की हे मिस्त्री माझ्या जिवावर गावातील बांधकाम घेतात असे म्हणुन त्यानी फिर्यादीस शिवीगाळ सुरु केली व बांधकामावरील पडलेल्या विटाच्या ढिगा–या तुन एक विट हातात घेवुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली व हातावर छातीवर लाथाबुक्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली व आमच्या भांडणाचा आवाज ऐकुन आमच्या गावातील मच्छीद्र इंगळे,गोंवीद इगळे व माझी पत्नी नामे कौशल्या यांनी आमच्या भांडणाची सोडवा सोडव केली व मी पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे जावुन औषध उपचाराचे पत्र घेवुन माजलगाव येथे गेलो होतो.दि १७ मे शुक्रवार रोजी औषध उपचार घेवुन पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरुन आरोपी सुरेश रामभाऊ इंगळे याच्या विरोधात दिंद्रुड पोलीस ठाण्यात गु.र.नं ९८/२०२४,कलम ३२४,३२३,५०४,५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन याप्रकरणाचा पुढील तपास पो.कॉ.एन.आर.वाघमारे हे करत आहेत.

## राजस्थानीच्या संचालकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी



### ठेवीदार आक्रमक

परळी । प्रतिनिधी

परळी येथील राजस्थानी मल्टीस्टेट को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळावर फसवणुकीचे गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी परळी येथील ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने शनिवार दि १८ रोजी शहर पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांची भेट घेतली. फसवणूक प्रकरणी २५ एप्रिल रोजी दाखल केलेल्या तक्रारी अर्जावरून संचालक मंडळावर कारवाई करावी असा आग्रह ठेवीदारांनी धरला आहे.

परळी येथील राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन व संचालक मंडळांनी मुदतीनंतर ही ठेवीदारांचे पैसे परत केले नाहीत . गेल्या आठ महिन्यापासून राजस्थानी मल्टीस्टेटच्या परळीतील सर्वच शाखा बंद आहेत.मल्टिस्टेटचे चेअरमन व संचालक मंडळ गायब झाले असून त्याचा संपर्क देखील होत नाही. मल्टिस्टेटच्या ठेवीदारांनी परळी येथील तहसील कार्यालयासमोर काही दिवसांपूर्वी उपोषण केले तसेच राजस्थानी मल्टीस्टेटच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली परंतु अद्यापही ठेवीदारांना पैसे मिळाले नसल्याने ठेविदार संतप्त झाले आहेत. यामुळे शनिवार दि १८ रोजी राजस्थानी मल्टीस्टेटच्या संचालक मंडळ विरोधात गुन्हे दाखल करावेत अशी मागणी परळीचे पोलीस निरीक्षकाकडे केली आहे.

लातूर पोलीस ठाण्यातही लातूर येथील एका ठेवीदारांनी संचालक मंडळाच्या विरोधात तक्रार दाखल केल्यावरून गुन्हे दाखल केले आहेत. या गुन्ह्याच्या तपासासाठी लातूर आर्थिक शाखेचे पोलीस परळीत येऊन मल्टिस्टेटच्या मुख्य शाखेला सील केल्याची माहिती समोर येत आहे दरम्यान परळी येथील ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने राजस्थानी मल्टीस्टेटच्या संचालक मंडळ विरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी शहर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलिस अधिकारी यांची भेट घेतली.

## तहसील व ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर खड्डेच खड्डे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

शहरातील तहसील कार्यालय, ग्रामीण रुग्णालय कडे जाण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्यावर जागोजागी मोठे मोठे खड्डे पडले आहेत या भागात राहणारे नागरिक पावसाळ्या पूर्वी खराब झालेला रस्ता दुरुस्त करण्याची मागणी करत आहेत.

खराब रस्त्यामुळे होणाऱ्या अपघाताचे प्रमाण अधिक असूनही खराब झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामान्य नागरिक करत आहे.भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालय मार्गावरील रस्ता आहे की नाही हेच समजत नाही जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत हे खड्डे अपघाता ला जणू निमंत्रण देत आहेत असेच दिसते तहसील कार्यालयामध्ये कामानिमित्त ग्रामीण भागातील शेतकरी, महिला, वयोवृद्ध, नागरिक ,तहसील कार्यालयातील कर्मचारी दररोज याच रस्त्याने कसरत करत कार्यालय गाठतात. हाच रस्ता ग्रामीण रुग्णालयाला देखील जोडला गेलेला आहे रुग्णालयात तपासणीसाठी जाणाऱ्या गरोदर माता भगिनी तसेच वयोवृद्ध रुग्णांना त्रास सहन करावा लागतो , ग्रामीण रुग्णालयातील अति गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी घेऊन जाण्यासाठी रुग्णवाहिका चालकास या रस्त्यावर मोठी कसरत करत मार्ग काढावा लागतो.या भागात राहणारे नागरिक या रस्त्याला वैतागून गेले आहेत निदान पावसाळ्यापूर्वी तरी हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी सामान्य नागरिक करत आहेत.





**अति गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी घेऊन जाण्यासाठी रुग्णवाहिका चालकास करावी लागते कसरत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**


cmyk

cmyk
राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.१९ मे २०२४
४

# २१ मे पासून शेतकऱ्यांना मिळणार कांदा बियाणे

## राहुरी विद्यापीठाने दिली माहिती

राहुरी : येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून २१ मे २०२४ पासून कांदा बियाणे विक्रीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने विद्यापीठाकडून विकसित खरीप कांद्याच्या 'फुले समर्थ' व 'फुले बसवंत- ७८०' या वाणांची विक्री केली जाणार आहे. कांदा बियाण्यांची ही विक्री विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. अशी माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून देण्यात आली आहे.



राहुरी विद्यापीठाने विकसित केलेल्या कांद्याच्या 'फुले समर्थ' व 'फुले बसवंत-७८०' या वाणांना शेतकऱ्यांकडून दरवर्षी मोठी मागणी असते. मोठ्या प्रमाणावर कांदा उत्पादक असलेल्या नाशिक, अहमदनगर व सातारा जिल्ह्यातील कृषी विद्यापीठाचे कृषी संशोधन केंद्र, निफाड, कांदा, लसूण व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत, कृषी संशोधन केंद्र, चास, जि. अहमदनगर, कृषी संशोधन केंद्र, बोरगाव, जि. सातारा, कृषी महाविद्यालय, मालेगाव जि. नाशिक, कृषी संशोधन केंद्र लखमापूर, कृषी विज्ञान केंद्र धुळे, कृषी महाविद्यालय पुणे व कृषी महाविद्यालय हाळगाव, ता. जामखेड या ठिकाणी या वाणांची विक्री सुरु करण्यात येणार आहे.

फुले समर्थ वाणाची वैशिष्ट्ये: फुले समर्थ हा वाण स्थानिक वाणातून विकसित केला आहे. हा वाण खरीप व रांगडा हंगामासाठी योग्य असून, कांदे चकचकीत गर्द लाल रंगाचे व उबट गोल असतात. कांद्याची नैसर्गिकपणे पात पडते. कांदा ८६ ते ९० दिवसांत काढणीस तयार होतो, त्यामुळे दोन ते तीन पाणी पाळ्यांची बचत होते. खरीप हंगामात या वाणापासून २८० क्विंटल प्रति हेक्टर तर रांगड्या हंगामात ४०० क्विंटल प्रति हेक्टरपर्यंत उत्पादन मिळते. फुले बसवंत वाणाची वैशिष्ट्ये : हा वाण पिंपळगाव बसवंत येथील कांदा संशोधन केंद्राने स्थानिक वाणातून विकसित केला आहे. हा वाण खरीप व रब्बी दोन्ही हंगामासाठी उपयुक्त आहे. कांदे आकाराने मध्यम ते मोठे व शेंड्याकडे थोडे निमुळते असतात. रंग गडद लाल असून हा वाण काढणीनंतर तीन ते चार महिने साठवणुकीत टिकून राहतो. हेक्टरी उत्पादन २५० ते ३०० क्विंटलपर्यंत मिळते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५६ : ब्रिटन देशाने फ्रांस देशाविरुद्ध युद्ध पुकारले.
१७७५ : मेरिकन क्रांती अमेरिकेने कॅनडाशी व्यापार बंद केला.
१७९२ : न्यू यॉर्क शेरबाजाराची स्थापना.
१८७२ : इंग्रज व मराठे यांच्यातील इतिहासप्रसिध्द सालबाईचा तह झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी बेल्जियममधील ब्रुसेल्स शहराचा ताबा घेतला.
१९१५ : युनायटेड किंग्डमचे सरकार अल्पमतात येउन कोसळले.
१९४९ : भारताचा राष्ट्रकुलामध्ये राहण्याचा निर्णय.
१९८३ : लेबाननमधुन सैन्य काढुन घेण्याच्या करारावर लेबानन, इस्त्रायल आणि अमेरिकेने सह्या केल्या.
१९९० : जागतिक आरोग्य संघटनेने समलैंगिकता मानसोपचार रोगांच्या यादीतून काढून टाकले.
१९९५ : जॅक शिराक फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.
२००४ : अमेरिकेतील पहिला कायदेशीर समलिंगी विवाह झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४९ : देवीची लस शोधून काढणारे संशोधक व डॉक्टर एडवर्ड जेन्नर यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८२३)
१८६५ : मुसलमानी काळापासून ब्रिटिश अमदानीपर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास लिहीणारे इतिहासकार रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचा जन्म. (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९५९)
१८६८ : डॉज मोटर कंपनी चे संस्थापक होरॅस डॉज यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९२०)
१८७८ : मुंबई प्रांताचे पहिले भारतीय राज्यपाल व महाराज हरि सिंह यांच्या कारकिर्दीतील जम्मू-काश्मीर प्रांताचे पंतप्रधान व जोधपुर चे दिवाण कपुरथला राजघराण्याचे राजा हरनाम सिंह यांचे पुत्र महाराजा सिंह यांचा जन्मदिन.
१८८८ : टिच फ्रीमन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५ : भारतीय आसामी इतिहासकार, नाटककार, निबंधकार आणि लघुकथा लेखक नकुलचंद्र भुयान यांचा जन्मदिन.
१९३४ : ऍपल इन्क कंपनी चे सहसंस्थापक रॉनाल्ड वेन यांचा जन्म.
१९४५ : भागवत चंद्रशेखर, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९५१ : गझल गायक पंकज उदास यांचा जन्म.
१९६६ : सद्दाम हुसेन यांचा मुलगा कुसय हुसेन यांचा जन्म. (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९७९ : अभिनेत्री मुक्ता बर्वे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८६ : डीयेर एंड कंपनीची स्थापक जॉन डीयेर यांचे निधन. (जन्म: ७ फेब्रुवारी १८०४)
१९७२ : रघुनाथ कृष्ण फडके, शिल्पकार.
१९९६ : कसोटी क्रिकेटपटू रुसी शेरियर मोदी यांचे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९२४)
२००४ : कमिला तय्यबजी, वकील, समाजसेविका.
२००९ : सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता प्रकाश मेहरा यांचे निधन.
२०१२ : अमेरिकन गायिका डोना समर यांचे निधन. (जन्म: ३१ डिसेंबर १९४८)
२०१४ : द लीला पॅलेस, हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स चे स्थापक सी. पी. कृष्णन नायर यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९२२)

# भारतीय मसाल्यावर नेपाळने घातली बंदी



नवी दिल्ली : भारतीय मसाल्यांवर नेपाळ सरकारने बंदी घातलेली आहे.भारतीय मसाले हे जगभरात त्याच्या चवीमुळे आणि औषधी गुणधर्मामुळे प्रसिद्ध आहेत. हे मसाले वेगवेगळ्या देशात निर्यात होतात.भारतीय मसाल्यात 'एथिलिन ऑक्साइडचे' प्रमाण अधिक आढळल्यामुळे भारतातील २ लोकप्रिय मसाला ब्रँड एव्हरेस्ट आणि एमडीएच यांच्यावर नेपाळ सरकारने बंदी घातली आहे. याआधी सिंगापूर, हाँगकाँग आणि न्यूझीलंड या देशांनी या मसाल्यावर बंदी घातली आहे. या दोन ब्रँडमुळे भारतातील सर्वच मसाला निर्यातदार कंपन्या अडचणीत सापडल्या आहेत. त्यामुळे भारताची मसाला निर्यात ५% घटली आहे.

मसाले दीर्घकाळ टिकावेत यासाठी स्टरलायझेशन आणि एव्हरेस्ट मसाल्यांत ईटीओचे प्रमाण जास्त आढळल्यामुळे भारतीय मसाल्यांबाबत जगभरात प्रतिकूल स्थिती निर्माण झाली आहे. 'फेडरेशन ऑफ इंडियन स्पाइस स्टेक होल्डर्स'चे चेअरमन अश्विन नायक यांनी सांगितले की, भारतातून दरवर्षी चार अब्ज डॉलरचे मसाले निर्यात होतात. मसाले सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वच देशांत ईटीओचा वापर केला जातो. मात्र त्याचे प्रमाण भिन्न असते.

ईटीओ हे मानवी प्रकृतीसाठी हानिकारक नाही. मुळात ईटीओ हे कीटकनाशक नाही. भारतीय मसाले निर्यात बोर्डाने यावर काही तरी पावले उचलायला हवीत. भारताचे मसाले १७० देशांत निर्यात होतात. ब्रिटनचे खाद्य नियामक 'फूड स्टँडर्ड ऑथॉरिटी' ने एक आदेश जारी करून भारतीय मसाल्यांची तपासणी वाढवली आहे. ब्रिटनमध्ये येणाऱ्या सर्व भारतीय मसाल्यांची आता कीटकनाशक अंश चाचणी केली जाईल.

कॅन्सरचा धोका? : नेपाळचे अन्न तंत्रज्ञान व गुणवत्ता नियंत्रण विभागाचे प्रवक्ते मोहन कृष्ण महाराजन यांनी सांगितले की, एथिलिन ऑक्साइडमुळे कॅन्सर होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे एमडीएच आणि एव्हरेस्ट मसाल्यांच्या आयातीवर नेपाळ सरकारने सात दिवसांची बंदी घातली आहे.

# महाराष्ट्रातील ४ प्रमुख जातींच्या गाई

शेती व्यवसायासोबतच पशुपालन हा व्यवसाय महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. यामध्ये मुख्यतः गाई, म्हशींचे पालन केले जाते. भारतात गायींच्या जवळजवळ २६ जाती आहेत. यामध्ये साहिवाल, गीर, राठी, थारपारकर आणि लाल सिंधी या गायी सर्वोत्कृष्ट समजल्या जातात. या गायींपासून शेतकऱ्यांना भरपूर उत्पन्न मिळते. यामुळे शेतकरी त्यांच्या संगोपनातून दूध उत्पादन करत मोठ्या प्रमाणावर नफा कमावत असतात.

महाराष्ट्रातील प्रमुख गायींच्या जाती :

देवणी गाय - महाराष्ट्रात लातूर, नांदेड, उस्मानाबाद, बीड, परभणी जिल्ह्यात ही गाय आढळून येते. डांगी व गिर यांच्या एकत्रित संकरातून तयार झालेल्या या गाईला मराठवाड्याचे भूषण असे म्हणतात. ही गाय दिवसाला ६ ते ७ लिटर दूध सहज देत असून, एका वेतात ६३६ ते १२३० किलोग्रॅम एवढे दूध उत्पादन देते. खिल्लार गाय - महाराष्टात ही गाय सोलापूर, सातारा, पुणे व कोल्हापूर येथे प्रामुख्याने आढळते. ही गाय प्रति वेताला ९०० ते १००० किलोग्रॅम एवढे दूध देते. ही गाय अत्यंत चपळ, काटक व आकर्षक दिसते.

गवळावू गाय - ही गाय नागपूर व वर्धा जिल्ह्यात आढळत असून, ही गाय दुधासाठी प्रसिद्ध आहे. गवळावू गाय एका वेतात ८०० लिटर दूध देते. या गाईपासून मिळणारे बैल हे चपळ व उत्कृष्ट असतात. ही गाय हलक्या बांध्याची व माध्यम उंचीची असूनही जाड कामासाठी उपयुक्त आहे. डांगी गाय - देशातील ही एक देशी गायीची जात म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रात नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांचा समावेश.

स्थानिक भाषेत हिला सोनखेरी व कलबेरी असेही म्हटले जाते. डांगी गाईचे नाव डांगपर्वत रांगामधून पडले. सह्याद्री पर्वत रंगांधले हे गोवंश आहे. डांगी या





गाई भिजल्या तरी पाणी अंगात मुरत नाही तसेच आजरपण ही येत नाही.

हे या जातीच्या गायींचे अति महत्वाचे वैशिष्ठ आहे. डांगी ही जात शरीराच्या आकाराने मध्यम ते मोठी असते. अतिवृष्टीच्या भागात त्यांच्या अनुकूलतेसाठी त्यांच्या त्वचेतून तेल घटक स्राव होतो. ज्यामुळे या जातीच्या गाई अतिवृष्टी सहन करू शकतात.

# जनावरांच्या आहारात करा लोहाचे महत्व

शेतकरी शेतीसोबत जोडव्यवसाय म्हणून पशुपालन करतात. या व्यवसायामध्ये चांगले उत्पादन मिळवण्यासाठी तसेच जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शेतकऱ्यांना वेगवेगळ्या गोष्टींची काळजी घ्यावी लागते. यामध्ये एक महत्वाचा घटक म्हणजे आहार. जनावरांच्या आहारात वेगवेगळी जीवनसत्वे वेगवेगळी कार्ये करतात.




जनावरांच्या आहारात लोहाचा वापर असणे गरजेचे असते. महत्त्वाचे म्हणजे जनावरांच्या शरीरातील लोहाची पातळी केवळ शोषणाद्वारे नियंत्रित केली जाते. जनावरांच्या शरीरातील लोह उत्सर्जनाची यंत्रणा ही एक अनियंत्रित प्रक्रिया आहे जी घाम येणे, केस आणि त्वचेच्या पेशी गळणे आणि एन्टरोसाइट्सचे जलद उलाढाल आणि उत्सर्जन या द्वारे होते. जनावरांच्या शरीरात लोह खालील प्रमाणे महत्त्वाचे कार्य करते. जनावरांच्या शरीरातील सुमारे ७० टक्के लोह रक्तातील हिमोग्लोबीन नावाच्या लाल रक्तपेशींमध्ये आणि मायोग्लोबिन नावाच्या स्नायूंच्या पेशींमध्ये आढळते. रक्तातील ऑक्सिजन फुफ्फुसातून उतींमध्ये हस्तांतरित करण्यासाठी हिमोग्लोबीन आवश्यक आहे.

जनावरांमध्ये लोहाच्या कमतरतेमुळे जाणवणारी लक्षणे : लोहाच्या कमतरतेमुळे रवंथ करणाऱ्या जनावरांमध्ये अत्यंत थकवा, अशक्तपणा येतो, त्वचा फिकट होते, छातीत दुखणे, जलद हृदयाचा ठोका होणे किंवा श्वास लागणे इत्यादी लक्षणे उद्भवतात. पाय थंड होणे, जिभेची जळजळ किंवा वेदना होणे, नखे ठिसूळ होणे इत्यादी लक्षणे दिसून येतात. वराह व त्यांच्या पिल्लांना पिगलेट ॲनिमिया आजार होतो.

आहार व्यवस्थापन : जनावराला खाद्यातून नियमित लोह युक्त क्षार मिश्रणे द्या. मोठ्या जनावरांत ५० ते १०० ग्रॅम, तर लहान जनावरांत १५ ग्रॅम ते २० ग्रॅम हे प्रमाण ठेवा. जनावराला पालेदार चारा विशेषतः द्विदल चारा त्यांच्या वजनाप्रमाणे द्या. आहारात लोह असलेले पदार्थ जास्त खायला द्या. पशुआहारात जीवनसत्त्व 'क' असलेले अधिक अन्न पदार्थ समाविष्ट करा. कारण ते शरीरात लोह शोषण्यास मदत करते.

# सोयाबीना बियाणेबाबत कृषी विभागाचा सल्ला

सोयाबीन हे खरीपातील एक मुख्य पीक आहे. बहुतेक शेतकरी खरीपात सोयाबीन लागवड करणार आहेत. सध्या पेरणीपूर्व मशागत पूर्ण होत आली असून सोयाबीन बियाणे पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु आहे. दरम्यान मागील दोन वर्षात शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या प्रमाणित बियाणांचा वापर पेरणीसाठी करू शकतात असे कृषी विभागाने सांगितले आहे. तसेच मागील दोन वर्षात खरेदी केलेल्या प्रमाणित बियाणांपासून उत्पादित झालेले सोयाबीन बियाणे चालू वर्षी बियाणे म्हणून शेतकरी पेरणीसाठी वापरू शकतात. तसेच ग्रामबिजोत्पादन पीक प्रात्यक्षिके योजनांतर्गत आलेल्या उत्पादनातून बियाणांची निवड करता येते.



सोयाबीन बियाण्याची वाहतूक व हाताळणी यामध्ये इजा झाल्यास उगवण क्षमतेवर परिणाम होतो त्यामुळे दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

सोयाबीन बियाण्यांसाठी कृषी विभागाचा सल्ला : बियाण्यांची साठवणूक करताना आर्द्रतेचे प्रमाण १० ते १२ टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. घरगुती बियाणे वापरत असल्यास अंकुरण क्षमता घरच्या घरी तपासून घ्यावी. साठवणूकीसाठी प्लॅस्टिक पोत्यांचा वापर न करता ज्यूट बारदानाचा वापर करावा. बियाणे साठवताना त्याची थप्पी ७ फुटापेक्षा जास्त उंच असणार नाही याची काळजी घ्यावी. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रीया करावी यामुळे बुरशीजन्य रोगांपासून पिकांचे संरक्षण करता येते. रायझोबियम व पीएसबी जीवाणू संवर्धकाची प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास पेरणीपूर्व तीन तास अगोदर बीजप्रक्रीया करून बियाणे सावलीत वाळवावे व नंतर त्याची पेरणी करावी.

# हिरवळीच्या खतांसाठी विविध पिकांचे नियोजन

ताग / बोरू : हे हिरवळीचे उत्तम खत आहे. ज्या विभागात पुरेसा पाऊस अथवा सिंचनाच्या पाण्याची हमी असते तेथे ताग लागवड करावी. सर्व प्रकारच्या जमिनीत या पिकाची वाढ चांगली होते. मात्र आम्लधर्मीय जमीन तसेच पाणी साचून राहणाऱ्या जमिनीत चांगली वाढ होत नाही. पावसाळ्याच्या सुरुवातीस हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पेरावे. पेरणीनंतर ५ ते ६ आठवड्यांनी हे पीक फुलोऱ्यावर येण्याच्या सुमारास ६० ते ७० सेंमी उंच वाढले असताना नांगराच्या साह्याने जमिनीत गाडून टाकावे. तागामध्ये नत्राचे प्रमाण ०.४६ टक्का असते. या पिकापासून हेक्टरी ८० ते ९० किलो नत्र मिळते.

धैंचा : तागापेक्षा हे काटक हिरवळीचे हे पीक आहे. कमी पर्जन्यमान, पाणथळ ठिकाण, क्षारमय किंवा आम्लधर्मीय जमिनीत हे पीक तग धरू शकते. याच्या मुळांवर तसेच खोडावर गाठी असतात. या गाठीमध्ये रायझोबियम जिवाणू सहजीवी नत्र स्थिरीकरणाच्या प्रक्रियेने हवेतील नत्राचे स्थिरीकरण करतात. पावसाच्या सुरुवातीस हेक्टरी २५ ते ४० किलो बियाणे पेरावे. पेरणीपूर्वी रायझोबियम जिवाणू संवर्धनाची प्रक्रिया बियाण्यास करावी. आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करून पीक ६ ते ७ आठवड्यांत ९० ते १०० सेंमी उंचीपर्यंत वाढले असता जमिनीत नांगराने गाडावे. धैंचापासून हेक्टरी १० ते २० टनांपर्यंत हिरव्या सेंद्रिय पदार्थांची निर्मिती होते. या वनस्पतीत नत्राचे शेकडा प्रमाण ०.४६ टक्का इतके आहे. भात लावणी करण्यापूर्वी आठ दिवस पीक जमिनीत गाडल्यास हेक्टरी ८० किलो नत्राची उपलब्धता होऊ शकते.

घेवडा : हे पीक कमी पर्जन्यमान व हलक्या प्रतीच्या जमिनीत चांगले वाढते. पाणथळ जमिनीस हे पीक योग्य नाही. पावसाळ्याच्या सुरुवातीला पेरणी करावी. प्रति हेक्टरी ५० किलो बियाणे पेरावे. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात जमिनीत गाडावे.



गिरिपुष्प (ग्लिरिसिडीया) : झुडूप वर्गातील हे हिरवळीचे खत कोणत्याही प्रकारच्या जमिनीत तसेच निरनिराळ्या पर्जन्यमानाच्या प्रदेशात चांगले येते. या झाडाची लागवड दोन प्रकारे करतात. पहिल्या पद्धतीत छाट कलमाद्वारे लागवड करण्यासाठी ३० सेंमी लांब ३ सेंमी व्यासाची दोन छाट कलमे निवडावीत. पावसाळ्याच्या सुरुवातीस बांधावर ३० सेंमी बाय ३० सेंमी बाय ३० सेंमी आकाराचा खड्डा करून कलमांची लागवड करावी किंवा पडीक जमिनीत लागवड करावी. दुसऱ्या पद्धतीत गादी वाफे तयार करून किंवा प्लॅस्टिकच्या पिशवीत बी पेरून रोपे तयार करावीत. ही रोपे ५ आठवड्यांची झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस शेताच्या बांधावर खड्डे खोदून लावावीत. पहिल्या वर्षी उन्हाळ्यात रोपांना पाणी देणे आवश्यक असून, दुसऱ्या वर्षांपासून पुढे प्रत्येक छाटणीला २५ ते ३० किलो हिरवा चारा मिळतो. या झाडाच्या फांद्यांची वरचेवर छाटणी करून नवीन फूट येते. त्यांच्या हिरव्या पालवीपासून हिरवळीचे उत्तम खत मिळते. गिरिपुष्पाची पाने धैंचा, वनझाडांच्या पालापाचोळयापेक्षा जलद कुजतात. गिरिपुष्पाच्या पानांमध्ये सेंद्रिय कर्ब ३६ टक्के, नत्र २.७० टक्के, स्फुरद ०.५ टक्का व पालाश १.१५ टक्का असते. म्हणून नत्रयुक्त खतांच्या खर्चात बचत करण्यासाठी गिरिपुष्प हिरवळीच्या खतांचा मोठा सहभाग आहे.

हिरवळीची पिकांचे नियोजन : मे-जून महिन्यात पिकाची पेरणी करावी किंवा बियाणे शेतात फेकून द्यावे, यासाठी बियाण्याचे प्रमाणे दीड पट जास्त वापरावे. यामुळे पिकाची दाट वाढ होते. पिकाची पर्णीय वाढ पूर्ण झाल्यावर फुलोऱ्यात येण्याआधी म्हणजे पेरणीपासून ६ ते ८ आठवड्यांसाठी पीक नांगरून जमिनीत गाडावे. शेतात पाणी द्यावे. त्याचे पूर्ण विघटन झाल्यावर पुढील रब्बी पिकाची वेळेवर पेरणी करावी. या प्रकारात खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या हातून जातो. पण त्याचा फायदा रब्बी हंगामात पेरलेल्या पिकास होतो. जमिनीची सुपीकता वाढविण्यास होतो. हिरवळीचे पीक आंतरपीक म्हणून घेता येते. उदा. कापूस, मका व फळबागेत ताग, धैंचा, बरसीम, चवळी ही हिरवळीची पिके आंतरपीक म्हणून पेरून ६ ते ८ आठवड्यांनी जमिनीत गाडून टाकावीत. हिरव्या पानांची पिके वापरावयाची असल्यास या पिकांची बांधावर किंवा पडीक जमिनीत लागवड करावी. या पिकांची हिरवी कोवळी पाने गोळा करून ती पूर्व मशागतीच्या वेळी जमिनीत मिसळावीत.

# घाटकोपरच्या दुर्घटनेतून बीड नगरपालिका बोध घेणार का?

## न्यायालयाच्या आदेशाचा अवमान,शपथपत्राद्वारे दिशाभूल कि पुन्हा येरे माझ्या मागल्या

बीड । प्रतिनिधी

मुंबईत घाटकोपर येथे अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ नागरीकांना जीव गमवावा लागला या दुर्घटनेनंतर बीड शहरातील अनाधिकृत होर्डींगचा मुद्दा चर्चेत आला असुन राज्याच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी व नगरपालिका मुख्याधिका-यांना तातडीने पत्र काढल्यानंतर निता अंधारे बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना जाग आली असुन शहरातील स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेत शहरातील ६ होर्डिंग्ज चालकांना नोटीसा बजावण्याचे आदेश दिले असुन कारवाईसाठी ८ जणांची नियुक्ती केल्याचे समजते.बीड शहरातील अधिकृत होर्डिंग्जची संख्या ३८ असल्याचा नगरपालिका दावा करत असली तरी प्रत्यक्षात १०० पेक्षा जास्त अनाधिकृत होर्डिंग्ज दिसून येत आहेत.शहरातील ईमारतीवर नगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता आणि कुठलेही स्ट्रक्चरल आडीट न करताच धोकादायक होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत.सामाजिक कार्यकर्ते यांनी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा केवळ २-४ होर्डिंग्ज काढुन कारवाई केल्याचे नाटक नगरपरिषद प्रशासन करत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे त्यामुळे घाटकोपर येथील अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ जण मृत्युमुखी पडलेल्या दुर्घटनेनंतर तरी बीड नगरपरिषद प्रशासन बोध घेईल का?? कि नेहमी प्रमाणेच केवळ कारवाईचे नाटक करते हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल तसेच या होर्डिंग्ज वरील जाहिरातीचा महसूल कोण गोळा करतं? या माध्यमातून शासनाचा महसूल बुडवुन कोणाची तिजोरी भरली जाते हा देखील संशोधनाचा विषय आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त करत कायमस्वरूपी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

बीड शहरातील बंजारा हाँटेल, एसपी आफिस समोर,सारडा कपिटल कार्नर ,सेंन्ट अन्स स्कुलसमोर,शिवराज पान सेंटरच्या वर,केएसके कालेज समोर,नगरनाका महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर,बंब सर्कल हिरालाल चौक, अक्षरधाम, बीड पंचायत समिती समोर,बालेपीर, बार्शी नाका चौक,जुने मारूती शोरूम,इंडीयन आईल पेट्रोल पंप बार्शी रोड, मुक्ता लान्स अशा विविध ठिकाणी १०० पेक्षा जास्त ठिकाणी अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेली आहेत.तसेच बीड शहरातील महत्त्वाचे चौक, दुभाजक याठिकाणी लहानमोठे अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेले असुन ते अपघाताला निमंत्रण देत आहेत.

बेकायदा होर्डिंग्ज,बनर, पोस्टर्स ,कमानी व जाहिराती हटवण्यासाठी काय पावले उचलण्यात आली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह राज्यातील महापालिका आणि नगरषरीषदसह सर्वच नागरी संस्थांना दिलेले आहेत .सन २०१७ च्या निकालात मुंबई उच्च न्यायालयाने हे मान्य केले आहे की बेकायदेशीर होर्डिंग्ज वर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांविरूद्ध गुन्हेगारी कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय वर्गाच्या सहभागामुळे महापालिका अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे काम खुप कठीण होताना दिसत आहे.मात्र असे असताना बेकायदेशीर होर्डिंग्ज, बनर,कमानी व अशा प्रकारच्या आकाश चिन्हांच्या माध्यमातून शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे अशी उच्च न्यायालयाची इच्छा असल्याने सन २०२२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्यातील सर्वच नागरी संस्थांना कारवाईचे निर्देश दिलेले आहेत.ज्यात महापालिका आणि नगरपरीषदांचा समावेश आहे.बेकायदेशीर होर्डिंग्ज,बनर , पोस्टर्स, कमानी काढुन टाकण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा अहवाल सादर करा तसेच बेकायदा होर्डिंग्जची यादी आणि कायदेशीर होर्डिंग्ज मधुन किती महसूल मिळतो याची माहिती असलेले प्रतिज्ञापत्र दाखल करा असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते.न्यायालयाचे आदेश असतानाही संबंधित यंत्रणा अंमलबजावणी करत नसुन कर्तव्यात कसूर करत असल्याचे दिसून येते.बीड नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांनी जुन २०२२ मध्ये शपथपत्र दाखल केले होते.मात्र तरीही अद्याप अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.व्यावसायिक जाहिरात दारांनी शहराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण केले असून सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारीनंतर कारवाई तर सोडाच साधे होर्डिंग्ज हटवण्याची तसदी सुद्धा नगरपरिषद प्रशासन घेताना दिसत नाही.



### होर्डिंग्ज मुळे वाहतुकीस अडथळा,अपघाताला निमंत्रण

बीड शहरात चमकोगिरी करणारांची मोठ्या प्रमाणावर खोगीरभरती असुन शहरातील मुख्य चौक मुख्य रस्त्यांवरही जयंती,उत्सव ,सण, आंदोलने, वाढदिवस आदी कार्यक्रमांचे सर्रास बनर लावले जातात. तसेच मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांमध्येही बनर उभे केले जातात.अनेकदा हेच बनर हवेने खाली पडुन अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.याचा फटका सर्वसामान्यांना , वाहनधारकांना बसतो.त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो.नगरपालिकेने विशेष मोहीम राबवुन अनाधिकृत बनर लागणार नाहीत याची काळजी घेणं आवश्यक आहे.मात्र नगर पालिका जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

# शेती विकत नसल्याने महिलेचा विनयभंग करून पतीस मारहाण

## महिलेची पोलीस अधीक्षकांकडे धाव

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर गावात असलेल्या इसाक नगर येथे शेतात राहणाऱ्या दांपत्याला शेजारी मला शेती विका म्हणून सतत दबाव टाकत आहे. शेती विकायची नाही म्हणणाऱ्या शेतकऱ्यास शेजारी शेत असलेल्या माणसाने स्वतःसह पत्नी आणि मुलांसह शेतकऱ्याच्या पत्नीचा विनयभंग करून शेतकऱ्याला बेदम मारहाण केली. यामुळे जखमी शेतकऱ्याला उपचारार्थ बीड जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले असून येथे उपचार सुरू आहेत. जखमी शेतकऱ्याच्या पत्नीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे धाव घेऊन पतीला मारहाण करणाऱ्या शेजारचे पती-पत्नी व त्यांच्या मुलांवर योग्य व कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आमच्या शेता मागे शेख जाहेद ऊर्फ रज्जू मौलीसाब याचे शेत आहे. म्हणून ते माझ्या पतीकडे तुमचे शेत मला विका म्हणून गेल्या काही वर्षापासून मागे लागला आहे. मला तुमचं शेत द्या, काय रक्कम पाहिजे बोला. असा सतत लकडा त्याने माझ्या पती मागे लावला आहे. परंतु पती शेत विकण्यास तयार नाही. यामुळे यावेळेस त्याने आमच्या घरी दिनांक १६ मे २०२४ गुरुवार रोजी संध्याकाळी ०४:०० ते ०५:०० वाजे दरम्यान मी, माझी लहान मुलगी आणि लहान मुलगा घरात एकटे असताना आरोपी शेख जाहेद उर्फ रज्जू मौलाना याने आमच्या घरी येऊन अश्लील वर्तन करत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. परंतु आमच्या घरी माझ्यासह माझी मुलगी व मुलं असल्याकारणाने तो निघून गेला. ही बाब माझे पती सय्यद दिलावर हे घरी आल्यानंतर मी त्यांच्यासमोर सांगितली असता ते शेख जाहेद याला विचारण्यास गेले. माझ्या पतींना एकटे बघून जाहेद याने त्याची मुले शेख अयाज, शेख शेराज, शेख अरफात, शेख फराज आणि बायको शेख नाज या सर्वांच्या सोबतीने माझ्या पतीस जबर मारहाण केली. त्यामध्ये माझे पती घायाळ झाल्याचे आम्हाला कळाल्यानंतर आम्ही धाव घेऊन त्यांना नेकनूर येथील शासकीय रुग्णालयात घेऊन गेलो नंतर डॉक्टरांमार्फत नेकनूर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. मात्र मारहाण जास्त प्रमाणात झाल्याने नेकनूर येथील डॉक्टरांनी प्रथमोपचार करून ॲम्बुलन्स द्वारे माझ्या पतीला बीड जिल्हा रुग्णालयात रेफर केले. सध्या माझ्या पतीवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांना मारहाण करणाऱ्या शेख जाहेद, त्याची बायको शेख नाज, मुले शेख अयाज, शेख शेराज, शेख अरफात, शेख फराज, या सर्वांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. अशी मागणी महिलेने पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# संत बंकटस्वामींनी काकडा भजनाची पद्धती वारकरी सांप्रदायाला दिली-राधाकृष्ण महाराज

बीड। प्रतिनिधी

संत बंकटस्वामी महाराज यांनी काकडा भजनाची विशेष उपासना पद्धती वारकरी सांप्रदायाला दिली. असे प्रतिपादन राष्ट्रिय भागवत कथा प्रवक्ते गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपूरकर यांनी केली.. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्यां पुण्यतिथी उत्सवात श्रीमद्? भागवत कथेत ते बोलतं होते. यावेळी प्रमुख उपस्थिती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, किसन महाराज पवार, उध्दव बापू आपेगावकर यांच्या हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती. पहिल्याच दिवशी कथा मंडप भाविकांनी हाऊसफुल्ल झाला. यावेळी विठ्ठला कधी येशील माझ्या घराला. यां गीतावर कथा मंडपात भाविकांनी मंत्रमुग्ध झाले होते. श्री क्षेत्र संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात जागतिक खात्याचे भागवत कथाकार गोवत्सल राधाकृष्ण महाराज यांच्या सुमधुरवाणी मधून भागवत कथेला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी भागवत महात्म्य व नाम महात्म्य संगती महिमा, यावरती महाराजांनी सुंदर शब्दात विवेचन केले. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी सांप्रदायात सेवा आणि काकडा हि विषेश उपासना पद्धती मधून देवाशी जोडता येत त्याची सोपी साधना सांगितली. स्वामी च्या दरबारात जेवढी सुंदर कथा होईल तेवढा विठ्ठल प्रसन्न होईल. असा विश्वास व्यक्त केला. संतावर प्रेम करतो तो देवाला मला आवडतो.देवाशी जोडण्याचां उत्तम काळ प्रातकाळ आहे.संत बंकट स्वामीच्या उपासनेची ऊर्जा अजही इथे पाहायला मिळते. कथा ही ताप हरणारी पाप मुक्त करणारी देवाची प्राप्ती करून देणारी आहे. कथेच्या सागरात प्रत्येकाने पवित्र स्नान करण्यासाठी यावे. असे महाराजांनी सांगितले. श्री कृष्णाची कथा जीवनाचा उध्दार करणारी आहे..



# विटाने डोक्यात गंभीर मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

बांधकाम करणारा मिस्त्री हा माझ्या जिवावर गावात बांधकाम घेतो असं म्हणत बांधकामाच्या ढिगाऱ्यावरील विट काढून डोक्यात विट घालुन मशुराम कुंडलीक जाधव यास गंभीर जखमी केल्याची घटना तालुक्यातील मोगरा येथे दि १५ मे बुधवार रोजी घडली याप्रकरणी आरोपी विरोधात दि १७ मे शुक्रवार रोजी दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात दिंद्रुड पोलिस ठाण्यात फिर्यादी मशुराम कुंडलीक जाधव,रा.मोगरा,तामाजलगाव यांनी दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की,

दि.१५ मे बुधवार रोजी सांयकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी घराचे बांधकाम करणारे मिस्त्री नामे शेख सादेक शेख जय दस्तगीर रा. माजलगाव याला माझे बाधंकाम तु दोन महीन्यात पूर्ण करतो असे म्हणून तु चार महीने झाले तरी तु माझे बांधकाम पुर्ण का केले नाही असे बोलत असताना मिस्त्रीनी आमच्या गावातील सुरेश रामभाऊ इंगळे रा शिवाजी नगर मोगरा ता. माजलगाव यांना बोलवुन घेतले असता सुरेश रामभाऊ इंगळे हे तेथे आला व फिर्यादीला म्हणाला की हे मिस्त्री माझ्या जिवावर गावातील बांधकाम घेतात असे म्हणुन त्यानी फिर्यादीस शिवीगाळ सुरु केली व बांधकामावरील पडलेल्या विटाच्या ढिगा-या तुन एक विट हातात घेवुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली व हातावर छातीवर लाथाबुक्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली व आमच्या भांडणाचा आवाज ऐकुन आमच्या गावातील मच्छीद्र इंगळे,गोंवीद इगळे व माझी पत्नी नामे कौशल्या यांनी आमच्या भांडणाची सोडवा सोडव केली व मी पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे जावुन औषध उपचाराचे पत्र घेवुन माजलगाव येथे गेलो होतो.

दि १७ मे शुक्रवार रोजी औषध उपचार घेवुन पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरुन आरोपी सुरेश रामभाऊ इंगळे याच्या विरोधात दिंद्रुड पोलीस ठाण्यात गु.र.नं ९८/२०२४,कलम ३२४,३२३,५०४,५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास पो. कॉ. एन. आर. वाघमारे हे करत आहेत.

# सरजुबाई भक्कड यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील आडत व्यापारी जवाहर भक्कड यांच्या मातोश्री श्रीमती सरजुबाई गंगाबिषण भक्कड यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले.प्रतिष्ठित उद्योजक लक्ष्मीनारायण मुंदडा यांच्या त्या जेष्ठ भगिनीं होत्या.



त्या धार्मिक वृत्तीच्या म्हणून सरजूबाई सर्वत्र परिचित होत्या.मागील काही काळापासून त्यांना तब्येत साथ देत नव्हती.दि १७ मे शुक्रवार रोजी दुपारी १२:०० वाजण्याच्या दरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा सत्यनारायण, जवाहर कपिल व नातवंडे असा मोठा परिवार आहे.राजस्थानी वैकुंठधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील व्यापारी, वकील, डॉक्टर उपस्थित होते.सरजू बाई भक्कड यांचा भक्कड व मुंदडा परिवाराचा उठावना राजस्थानी मंगल कार्यालय येथे दि १९ मे रोजी दुपारी ३:०० वाजता आहे.

# बंकटस्वामीनी जातीपातींच्या भिंती नष्ट करून माणुसकीची चळवळ दृढ केली-शिवाजी महाराज

बीड । प्रतिनिधी

दि- १८ ऐश्वर्य संपन्न संत बंकटस्वामीनी जातीपातीच्यां भिंती नष्ट करून माणुसकीची चळवळ दृढ केली. असे प्रतिपादन महंत शिवाजी महाराज नारायणगडकर यांनी केले. श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तनपुष्प गुंफताना ते बोलतं होतें.यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , सत्यवान महाराज लाटे, नाना महाराज कदम,सुरेश म जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव, वसंत महाराज शिंदे, विष्णुपंत महाराज लोंढे यांच्या सह हजारो भावीक भक्त मंडळी उपस्थीत होतें..

बीड तालुक्यांतील श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवात पाहिल्या दिवसांचे कीर्तन पुष्प प्रेममूर्ती शिवाजी महाराज नारायणगडकर यांनी गुफले. यावेळी त्यानी.. संत तुकाराम महाराज यांच्या विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा करी पापा निर्मूळ भाग्यवंता छंद मनी कोड कानीं ऐकती धृ विठ्ठल हे दैवत भोळे चाड काळे न धरावी तुका म्हणे भलते याती विठ्ठल चिती तो धन्य नामपर अभंगावर चिंतन मांडले.. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की ऐश्वर्य संपन्न संत स्वानंद सुखनिवासी बंकटस्वामी यांच्यात दरबारात आज प्रत्यक्ष पांडुरंग उपस्थीत आहे..साधू संतांचे आध्यात्मिक वैभव म्हणजेच वैकुंठ आहे. संत बंकटस्वामी महाराज यांनी तपश्चर्या करुण साधना करून सिद्धता प्राप्त केली..संतांचे तत्वज्ञान माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून देते..बंकटस्वामी महाराज संस्थान हे थोरले संस्थानं आहे. संपुर्ण महाराष्ट्रात वारकरी धर्माची पताका फडकावली. सप्ताहात पहील्या दिवशी मंगल करावे लागते. त्यामूळे सकाळ मंगळ निधी ! श्रीविठ्ठलाचे नाम आधी !! अनुभवाचे तत्व ज्ञान सांगणारे संत असतात. परमार्थात सर्व साधना पेक्षा सोप साधन नाम आहे. जिवनात समाधान मिळवायचे असेल तर नाम स्मरण करावे लागेल..सदा नाम घोष करू हरि कथा ! तेणे सदा चित्ता समाधान!! सुखात समाधान नाही. समाधनात सुख आहे. आहे त्यामूळे नामस्मरण प्रत्येकानं करावं. असे महाराजांनी सांगीतले.. विठ्ठल मंत्र सोपा आहे.. त्याचा उच्चार केला तर संपुर्ण जीवन पाप मुक्त होतें. नाम जपण्याच्या अधिकार सर्वांना आहे. जाती पातीचां भेद भाव परमार्थात नाही. भाग्यवंत लोकं या नामाचे स्मरण करतातआणि श्रवण करतात..विठ्ठल हे दैवत भोळे आहे. जो विठ्ठल भक्ती करतो तो कोणत्याही भलत्या जातीचा पातीचा असला तरी तो धन्य आहे. असे महाराज म्हणाले. कीर्तनास साथ संगत महाराष्ट्रातील नामंकित गायक वादक गोविंद महाराज नाईकवाडे, सिध्देश्वर महाराज बागलाने, अभिमान ढाकणे, अनिकेत महाराज लांडे, सतीश महाराज जाधव, रोहिदास महाराज शिंदे, वसंत महाराज शिंदे, यांच्यासह बंकटस्वामी फडावरील सर्व टाळकरी मंडळी उपस्थीत होतें.



# गेवराईत विविध कार्यक्रमाचे आयोजन- शेख मोहसिन

गेवराई । प्रतिनिधी

रणविर अमरसिंह पंडीत यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध सामाजिक कार्यक्रम राष्ट्रवादी विद्यार्थी कॉग्रेस शहराध्यक्ष शेख मोहसिन भाऊ यांच्या कडुन आयोजन करण्यात आले आहे. प्रथम कार्यक्रम शेख खाजा मामु मित्र मंडळ व गेवराई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत आरोग्य शिबीर दि. १७ मे २०२४ शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता डॉ.शेख सोहेल यांचे गेवराई हॉस्पिटल मौलाना आझाद चौक मोंढा रोड गेवराई येथे आयोजन करण्यात आले.

तसेच अपंगांना मोफत धान्य वाटपाचे कार्यक्रम दिनांक १८ मे २०२४ शनिवार रोजी सकाळी १० वा. मार्केट कमिटी, मोंढा गेवराई येथे आयोजन करण्यात आले. तसेच गरीब महिलांना साडी वाटपाचे कार्यक्रम दिनांक १९ मे २०२४ रविवार सायं. ०६ वा. राज गल्ली, मेन रोड, गेवराई येथे आयोजन करण्यात आले. तसेच गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचे कार्यक्रम दिनांक २० मे २०२४ सोमवार सकाळी ११ वा ठिकाण समर्थ कोचिंग क्लासेस, जैन मंदीर समोर, गेवराई येथे आयोजन करण्यात आले तसेच रुग्णांना फळ वाटपाचे कार्यक्रम दिनांक २१ मे २०२४ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वा ठिकाण : उपजिल्हा रूग्णालय, गेवराई येथे आयोजन करण्यात आले.

अनाथ मुलांना खाऊ वाटपाचे कार्यक्रम दिनांक २२ मे २०२४ बुधवार रोजी सकाळी ११ वा सहारा अनाथालय, बालग्राम, गेवराई येथे आयोजन करण्यात आले.तसेच मजुर कामगारांना टी-शर्ट वाटपाचे कार्यक्रम दिनांक २३ मे २०२४ गुरूवार रोजी सकाळी ११ वा अरहान फंक्शन हॉल, मोंढा विभाग, गेवराई येथे आयोजन करण्यात आले आहे.तरी सर्व नागरीकांनी या विविध सामाजिक उपक्रमाचे लाभ घ्यावे आले अव्हान आयोजक राष्ट्रवादी विद्यार्थी कॉग्रेस शहराध्यक्ष शेख मोहसिन भाऊ यांनी केले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

रविवार दि.१९ मे २०२४ | ६



# दिंडोरीत काका-अण्णांची प्रतिष्ठा पणाला

**दिंडोरी । प्रतिनिधी**

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपच्या डॉ. भारती पवार आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे भास्कर भगरे गुरुजी यांच्यात अटीतटीची लढत होत आहे. खरे तर डॉ. भारती पवार केंद्रीय राज्यमंत्री आहेत. मात्र, या भागात कांद्याचा प्रश्न चांगलाच चर्चेत आला आहे. कांदा उत्पादक शेतकरी भाजप सरकारवर नाराज आहेत. तसेच या मतदारसंघात शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे भगरे यांनी डॉ. पवार यांच्यासमोर आव्हान उभे केले आहे. त्यातच या लोकसभा निवडणुकीकडे अनेक विधानसभा मतदारसंघातील प्रतिस्पर्धी विधानसभेची रंगीत तालिम समजत आहेत. याच मतदारसंघातील निफाड विधानसभा मतदारसंघातही विद्यमान आमदार दिलीप बनकर आणि माजी आमदार अनिल कदम यांची म्हणजे अण्णा-काका यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.



निफाडमध्ये विद्यमान आमदार दिलीप बनकर हे खरे तर शरद पवार यांचे विश्वासू मानले जात होते. परंतु ते अजित पवार गटात गेले असून, महायुतीचा धर्म म्हणून ते भाजपच्या डॉ. भारती पवार यांचा प्रचार करीत आहेत आणि त्यांचे प्रतिस्पर्धी आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत डॉ. भारती पवार यांच्यासाठी काम करणारे माजी आमदार अनिल कदम आता तुतारीचा प्रचार करीत आहेत. या दोघांमध्ये निफाडमध्ये राजकीय संघर्ष आहे. त्यामुळे दोन्ही नेत्यांनी आपल्याच उमेदवाराला कसे मताधिक्य देता येईल, यासाठी प्रयत्न सुरू केला आहे.

निफाडमध्ये काका-अण्णांच्या राजकारणावर समीकरणे जुळून येतात. मागील लोकसभा निवडणुकीत भारती पवार यांच्या विजयासाठी निफाडने मोठ्या प्रमाणात आपला कौल दिला होता. अनिल कदम यांनी निफाडची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन भारती पवारांना मोठे मताधिक्य दिले. मात्र यंदाच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलली असल्याने दिलीप बनकर हे भारती पवारांच्या प्रचारात उतरले आहेत तर महाविकास आघाडीच्या भास्कर भगरेंच्या विजयाची धुरा अनिल कदम यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. त्यामुळे अण्णा आणि काकांच्या राजकारणाचा नेमका फायदा कोणाला, हा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.

निफाडच्या मतांचा नेमका कोणाला फायदा होणार आणि कोणाला तोटा हे निवडणुकीनंतरच समजेल. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांमुळे निफाडचा मतदारांचा कौल हा महाविकास आघाडीच्या बाजूने झुकताना दिसत आहे. त्यामुळे विद्यमान आमदार दिलीप बनकर हे निफाडमधून सर्वाधिक मताधिक्य देण्यासाठी भारती पवारांच्या प्रचारात उतरले आहेत.

### कदम यांचा तुतारी वाजविण्याचा निर्धार

यंदा वाजणार तर तुतारीच, असा विश्वास व्यक्त करत माजी आमदार अनिल कदम हे भारती पवारांच्या विरोधात निफाडचे मैदान गाजवत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे निफाडमधील कौल नेमका कोणाच्या पारड्यात पडणार, हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### विधानसभा निवडणुकीची रंगीत तालिम

निफाडमध्ये दिलीप बनकर विरुद्ध अनिल कदम हा राजकीय संघर्ष असताना या दोन आजी- माजी आमदारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. त्यामुळे भारती पवार विरुद्ध भास्कर भगरे ही लढत न बघता थेट विधानसभेची रंगीत तालीम समजून दिलीप बनकर आणि अनिल कदम हे दोघे निफाडचा कौल हा आपापल्या उमेदवाराला देण्यासाठी मैदानात उतरले आहेत.

# कर्नाटकात डीकेंचा १०० कोटींचा डाव

**बेंगळुरू । वृत्तसंस्था**

कर्नाटकचे भाजप नेते जी. देवराज गौडा यांनी उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यावर एक खळबळजनक आरोप केला आहे. माजी मुख्यमंत्री आणि जेडीएस प्रदेशाध्यक्ष एचडी कुमारस्वामी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा खराब करण्यासाठी डीके शिवकुमार यांनी १०० कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा दावा भाजपचे देवराज गौडा यांनी केला आहे.




देवराज गौडा यांना नुकतीच एका लैंगिक शोषण प्रकरणात अटक करण्यात आली होती. शनिवारी देवेगौडा यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती, त्यादरम्यान माध्यमांशी बोलताना देवेगौडा यांनी हा दावा केला आहे. एआयएएनएस या वृत्तसंस्थेनुसार, न्यायालयीन कोठडीत पाठवल्यानंतर एका पोलिस वाहनात माध्यमांशी संवाद साधताना देवराज गौडा यांनी दावा केला की, शिवकुमार यांनी त्यांना बंगळुरूमधील ११० क्रमांकाच्या खोलीत ॲडव्हान्स म्हणून ५ कोटी रुपये पाठवले होते. मी ही ऑफर नाकारल्याचे देवराज गौडा यांनी सांगितले. सुटकेनंतर मी त्यांचा (डीके शिवकुमार) पर्दाफाश करेन. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार पडणार आहे. डीके शिवकुमार यांना पंतप्रधान मोदींची प्रतिमा डागाळायची आहे, असा दावा भाजप नेत्याने केला. देवराज गौडा म्हणाले, ''कुमारस्वामी यांनी लैंगिक छळाशी संबंधित व्हिडिओ असलेले पेन ड्राईव्ह प्रसारित केले, असे विधान करण्यास मला सांगण्यात आले होते. देवराज गौडा यांनी पुढे दावा केला की, चन्नरायपटना येथील स्थानिक नेते गोपालस्वामी यांना हे डिल करण्यासाठी माझ्याकडे पाठवण्यात आले होते. देवराजे गौडा म्हणाले, शिवकुमार यांचा मुख्य उद्देश कुमारस्वामींना राजकीयदृष्ट्या संपवणे आहे. त्यांनी पुढे सांगितले की, जेव्हा मी त्यांच्या योजनांचा भाग होण्यास नकार दिला, तेव्हा त्यांनी मला अत्याचाराच्या प्रकरणात गोवले, परंतु नंतर कोणताही पुरावा सापडला नाही. माझ्यावरील लैंगिक छळाचा खटलाही अयशस्वी ठरल्यानंतर त्यांनी माझ्यावर नवा लैंगिक छळाचा गुन्हा दाखल केला.

# महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार बेकायदेशीर

## काँग्रेस नेत्यांचा पत्रकार परिषदेत हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार बेकायदेशीरपणे स्थापन करण्यात आले असून, मोदी सरकारने देशात विश्वासघाताचे राजकारण सुरू केले आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. मोदींनी घटनात्मक संस्थेचा गैरवापर करून ब्लॅकमेल करून आणि धमकी देऊन विविध राज्यांतील विरोधी पक्षातील नेत्यांना फोडून भाजपने सत्ता स्थापन केली आहे. तोच प्रकार महाराष्ट्रात पहायला मिळाला. महाराष्ट्राशिवाय मोदींनी कर्नाटकमध्ये, मणिपूर, गोवा, मध्य प्रदेश, गुजरात या राज्यात देखील तोच प्रकार केला, असा गंभीर आरोपही खरगे यांनी केला.

लोकसभा निडवणुकीच्या पाचव्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा शनिवारी थंडावल्या त्यापूर्वी इंडिया आघाडीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपसह महायुतीचा चांगलाच समाचार घेतला. तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोदींवर निशाणा साधला. इंडिया आघाडीने मुंबईत पत्रकार परिषद घेतली. त्यात मोदींनी धमकी, आमिषं दाखवून विरोधक फोडल्याचा दावा केला. यावेळी इंडिया आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते.

### मल्लिकार्जून खरगेंनी निवडणूक आयोगावर व्यक्त केला संशय

देशात सध्या मूळ पक्ष चोरण्याचे काम सुरू असून, भाजपला पाठिंबा देणाऱ्या लोकांना मूळ पक्षाचे नाव, चिन्ह देण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे खरगे यांनी निवडणूक आयोग आणि न्यायपालिकेवरही संशय व्यक्त केला. या सर्व गोष्टी पंतप्रधान मोदींच्या इशाऱ्यावर होत असल्याचा आरोप खरगे यांनी केला. देशाच्या इतिहासात कोणत्याच पंतप्रधानांनी तोडफोडीचे राजकारण केले नाही, असा दावाही खरगे यांनी केला.



# सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असल्याने काँग्रेसनेही राम मंदिर बांधलेच असते

**जयपूर । प्रतिनिधी**

काँग्रेस वारंवार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राम मंदिर बांधल्याचे सांगत आहे. याच दरम्यान आता राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी मोठा दावा केला आहे. केंद्रात एनडीए नसून यूपीए सरकार असते तरी राम मंदिर बांधले असते असे म्हटले आहे. अशोक गेहलोत यांनी यामागे एक मोठे कारण देखील सांगितले आहे.




अशोक गेहलोत म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी राम मंदिराबाबत लोकांमध्ये संभ्रम पसरवत आहेत आणि निवडणूक जिंकण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. वृत्तसंस्थेशी बोलताना भाजपाच्या आरोपांना उत्तर देताना काँग्रेस आल्यास राम मंदिराला कोणताही धोका नाही असे म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राम मंदिर बांधले गेले आहे. त्यांना संभ्रम आहे. सरकार एनडीएचे नसते आणि यूपीएचे असते, भाजपाचे नसते आणि काँग्रेसचे असते तरीही मंदिर बांधले गेले असते कारण तो सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. ते संभ्रम पसरवत आहेत. मोदीजी खोटे बोलतात. निवडणूक जिंकण्यासाठी पंतप्रधान मोदी कोणत्याही थराला जाऊ शकतात हे जनतेला समजले आहे असे अशोक गेहलोत यांनी म्हटले आहे.

राजस्थानमध्ये २५ जागांसाठी १९ एप्रिल आणि २६ एप्रिलला दोन टप्प्यात मतदान झाले. मतदान संपल्यानंतर भाजपा आणि काँग्रेसचे राजस्थानचे नेते आता इतर राज्यांतील आपल्या पक्षाच्या नेत्यांचा प्रचार करत आहेत. याच दरम्यान अशोक गेहलोत हे सध्या उत्तर प्रदेशातील अमेठीला भेट देत असून काँग्रेस उमेदवाराच्या समर्थनार्थ जाहीर सभेला संबोधित करत आहेत. भाजपा खासदार आणि केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या विरोधात काँग्रेसने किशोरीलाल शर्मा यांना उमेदवारी दिली आहे.

# 'मुंबई बॉम्बहल्ल्यातील आरोपी प्रचारात पाहून बाळासाहेबांच्या आत्म्यालाही वेदना होत असतील'

**मुंबई । प्रतिनिधी**

बॉम्बस्फोटातील आरोपी नकली शिवसेनेच्या प्रचारात सहभागी झाल्याचे पाहून वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्म्याला वेदना होत असतील, अशा शब्दांत मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शनिवारी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. मोहन यादव यांनी आज दक्षिण मुंबईत महायुतीतील शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार यामिनी जाधव यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंसह महाविकास आणि इंडिया आघाडीवर सडकून टीका केली.



''बाळासाहेब ठाकरेंच्या हिंदुत्वाच्या विचारधारेला तिलांजली देत नकली शिवसेना हिंदूत्वविरोधी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसली आहे अशी टीकाही त्यांनी केली. उद्धव ठाकरेंना लक्ष्य करत ते म्हणाले की नकली शिवसेनेचे इतके अध:पतन झाले आहे की व्होटबँकेचे राजकारण करणाऱ्या काँग्रेसच्या रांगेत ते जाऊन बसले आहेत. १९९३ बॉम्बस्फोटातील आरोपी इब्राहिम मुसाला उबाठा सेनेच्या प्रचारात उतरवून शेकडो मुंबईकरांचे बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांचे समर्थन नकली शिवसेना करत आहे. हा मुंबईकरांचा घोर अपमान आहे. मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी नकली शिवसेनेच्या प्रचारात सहभागी झाल्याचे पाहून वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्म्याला वेदना होत असतील,'' असे म्हणत मोहन यादव यांनी ठाकरेंवर टीकास्त्र सोडले.

# आम्ही भाजपच्या मुख्यालयात येतोय हिंमत असेल तर अटक करा

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना थेट आव्हान दिले आहे. उद्या माझ्या अनेक बड्या नेत्यांसह मी भाजपच्या हेडक्वार्टरवर धडक देणार आहे, कोणा कोणाला तुम्हाला तुरुंगात टाकायचे आहे त्यांना टाका, असे त्यांनी जाहीर केले आहे.




केजरीवाल म्हणाले, तुम्ही पाहात आहात की मोदी आम आदमी पार्टीच्या कसे मागे पडले आहेत, ते आमच्या नेत्यांना कशा प्रकारे तुरुंगात टाकत आहेत. त्यांनी मला तुरुंगात टाकले, मनिष सिसोदिया यांना तुरुंगात टाकले, संजय सिंह, सत्येंद्र जैन यांना तुरुंगात टाकले. आज माझ्या पीएला देखील तुरुंगात टाकले. आता ते राघव चढ्ढा जे नुकतेच लंडनवरुन परतलेत त्यांनाही तुरुंगात टाकणार असल्याचे कळत आहे. मला पंतप्रधानांना विचारायचे आहे की, तुम्ही हा जेल-जेलचा खेळ खेळत आहात. त्यानुसार आमच्या एकेका व्यक्तीला तुरुंगात टाकत आहात. उद्या मी १२ वाजता आमच्या सर्व बड्या नेत्यांसह, आमदार-खासदारांसह भाजपच्या मुख्यालयात येणार आहे. ज्यांना तुम्हाला तुरुंगात टाकायचे आहे टाका, एकाच वेळी सर्वांना तुरुंगात टाका.

तुम्हाला वाटत आहे की, असे करुन तुम्ही आम आदमी पार्टीला चिरडून टाकाल पण अशा प्रकारे आम आदमी पार्टी संपणार नाही. एकदा तुम्ही सर्वांना तुरुंगात टाकून तर बघा. आम आदमी पार्टी हा विचार आहे जो संपूर्ण देशभरात लोकांच्या हृदयात पोहोचला आहे. जितक्या आपच्या नेत्यांना तुम्ही तुरुंगात टाकाल तितके शेकडो नेते हा देश तयार करेल, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे.

मी विचार करतोय की हे आम्हाला तुरुंगात का टाकत आहेत, आमची चूक काय आहे. आमची चूक ही आहे का की आम्ही दिल्लीतील गरिबांच्या मुलांसाठी चांगल्या शिक्षणाची सोय केली, त्यासाठी चांगल्या सरकारी शाळा तयार केल्या. हे बनवू शकत नाहीत, त्यामुळे आमची काम हे थांबवू पाहात आहेत. आम्ही दिल्लीत मोहल्ला क्लिनिक बनवलेत, चांगल्या मोफत उपचारांची सोय केली, ते हे करु शकत नाही. दिल्लीतील २४ तास मोफत सुरु असणारी वीज यांना बंद करायची आहे, हीच आमची चूक आहे. यासाठीच ते आम्हाला तुरुंगात टाकत आहेत, अशा शब्दांत केजरीवाल यांनी मोदींवर जोरदार टीकास्त्रही सोडले.

# परळीत लोकशाही नव्हे तर गुंडाराज ? ; व्हिडिओ पोस्ट करत रोहित पवारांचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात त्यातही विशेषत: परळी मतदार संघात मतदारांना बाहेर काढून भाजपने गुंडाकडून मतदान करून घेतले. आता यापुढे परळीत लोकशाही ऐवजी गुंडाराज चालणार का? असा सवाल उपस्थित करत आ.रोहित पवार यांनी तीन व्हिडीओ सोशल मीडिया साईट एक्सवर पोस्ट केले आहेत. भविष्यात असेच चालू राहिले तर महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश व्हायला वेळ लागणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.



लोकसभेची मतदान प्रक्रिया १३ मे रोजी पार पडली. यात जिल्ह्यातील काही मतदान केंद्र ताब्यात घेऊन बोगस मतदान केल्याचा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केला होता. यासंदर्भात त्यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रारही केली होती. या तक्रारीचे निरसण होण्याआधीच आ.रोहित पवार यांनीही तीन व्हिडीओ सोशल मिडियात पोस्ट करून बीड जिल्ह्यात बोगत मतदान झाल्याचा आरोप केला आहे. खासकरून परळी मतदार संघात मतदारांना बाहेर काढून भाजपने गुंडांकडून मतदान करून घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. निवडणूक आयोग याला चाप लावणार की बघ्याची भूमिका घेणार? याबाबत उत्तर द्यावे, अशी मागणी आ.पवार यांनी केली आहे. दरम्यान, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना या प्रकरणासंदर्भात विचारणा करण्यासाठी अनेकदा कॉल केला, परंतू त्यांनी फोनला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांची बाजू समजली नाही. बीड जिल्ह्यात विशेषता परळी भागात मतदान कक्षातून मतदारांना बाहेर काढून आपल्याला हवे तसे मतदान भाजपने गुंडांकडून करून घेतल्याची माहिती समोर येत आहे.म्हणजेच पवित्र देवस्थान असलेल्या परळीत आता यापुढे लोकशाही नव्हे तर गुंडाराज चालणार का? हे असेच सुरू राहिले तर महाराष्ट्राचा उत्तर

### एक्सच्या पोस्टमध्ये काय म्हटले

बीड जिल्ह्यात विशेषता परळी भागात मतदान कक्षातून मतदारांना बाहेर काढून आपल्याला हवे तसे मतदान भाजपने गुंडांकडून करून घेतल्याची माहिती समोर येत आहे. म्हणजेच पवित्र देवस्थान असलेल्या परळीत आता यापुढे लोकशाही नव्हे तर गुंडाराज चालणार का? हे असेच सुरू राहिले तर महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश व्हायला वेळ लागणार नाही. निवडणूक आयोग या गुंडगिरीला चाप लावणार आहे की केवळ बघ्याची भूमिका घेणार आहे? ने उत्तर द्यावे. असे त्यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

### राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचाही व्हिडीओ

परळी मतदार संघातीलच एका केंद्रावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते गेले होते. तेथे बोगस मतदानावरून कर्मचाऱ्यांना बोलत असल्याचा एक कथीत व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. याबाबत अद्यापतरी प्रशासनाकडे तक्रार आलेली नाही.

# स्वामी प्रसाद मौर्य यांच्या मुलाचा काँग्रेसमध्ये प्रवेश

रायबरेली : लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर देशातील विविध पक्षांच्या छोट्या-मोठ्या नेत्यांनी पक्षांतराचा खेळ सुरू केला आहे. यामध्ये ज्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत तेही अर्ज मागे घेऊन इतर पक्षात प्रवेश करत आहेत. असाच प्रकार स्वामी प्रसाद मौर्य यांचा मुलगा उत्कर्ष मौर्य यांनी केला असून, उत्कर्ष यांनी कुशीनगरमधून आपली उमेदवारी मागे घेतली आणि काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी उत्कर्षचे पक्षात स्वागत केले.



मिळालेल्या माहितीनुसार, उत्कर्ष मौर्य यांनी मनोज पांडे यांच्या विरोधात उंचाहारमधून विधानसभा निवडणूक लढवली आहे. उत्कर्ष यांचा पक्षात समावेश करून काँग्रेसने मनोज पांडे यांना कोंडीत पकडण्याची रणनीती सुरू केली आहे. मौर्य उंचाहार रायबरेली येथील आहेत. रायबरेलीमध्ये २० मे रोजी पाचव्या टप्प्यात मतदान होणार आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी राष्ट्रीय शोषित समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी मंत्री स्वामी प्रसाद मौर्य यांचे पुत्र असलेले उत्कर्ष मौर्य यांनी यूपीच्या कुशीनगर लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र त्यांनी काल आपला उमेदवारी अर्ज मागे घेत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सर्व पशुधनाचे ईअर टॅगिंग करून घेणे बंधनकारक


## विभागांनी शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करावी – जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन (एनडीएलएम) अंतर्गत 'भारत पशुधन प्रणाली' मध्ये ईअर टॅगिंग केलेल्या सर्व पशुधनाच्या सर्वंकष नोंदी घेण्यात येत असून शेतकऱ्यांनी आपल्या पशुधनाचे ईअर टॅगिंग करून घेणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयाची सर्व संबंधित विभागांनी काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहे.

केंद्र शासनाच्या भारत पशुधन प्रणालीमध्ये ईअर टंगिग (१२ अंकी बार कोडेड) केलेल्या सर्व पशुधनाच्या सर्वंकष नोंदी घेण्यात येत आहेत. यामध्ये जन्म-मृत्यु नोंदणी, प्रतिबंधात्मक लसीकरण व औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण यांचा समावेश आहे. थोडक्यात या प्रणालीवर संबंधित पशुधनाची प्रजनन, आरोग्य, मालकी हक्क, जन्म-मृत्यू आदी सर्व माहिती उपलब्ध होते.

राज्यातील सर्व पशुधनाची सर्वंकष माहिती एका ठिकाणी उपलब्ध होऊन पशुधनामधील सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रण करण्याकरिता तसेच प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच पशु व पशुजन्य उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील



सर्व पशुवैद्यकीय संस्थामार्फत पशुधनास कानात टॅग (बिल्ला) लावून त्याची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्था यांना विविध निर्देश दिले आहेत. त्यानुसार १ जूननंतर ईअर टॅगिंगशिवाय पशुधनास पशुवैद्यकीय संस्था / दवाखान्यामधून कोणतीही पशुवैद्यकीय सेवा देण्यात येऊ नये. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या कत्तलखान्यामध्ये टॅग असल्या शिवाय म्हैस वर्गीय जनावरांची कत्तल करण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

सर्व महसूल, वन, वीज व महावितरण विभाग यांनी नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्य पशूच्या हल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास ईअर टॅगिंग केलेली नसल्यास नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येऊ नये. कोणत्याही पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंग असल्याशिवाय करता येणार नाही, तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर उचित कायदेशीर, दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

१ जूनपासून ईअर टॅग नसलेल्या पशुधनाची, बाजार समित्या, आठवडी बाजार व गावा गावातील खरेदी-विक्री व बैलगाडा शर्यत आयोजन करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. त्यामुळे टॅग नसलेल्या पशुधनास बाजार समितीमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये व त्यांची खरेदी विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समितीने घ्यावी, तसेच ग्रामपंचायत, महसूल विभाग, गृह विभाग यांनी टॅग नसलेल्या बैलांना बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग घेण्यास परवानगी देवू नये.

पशुधनाच्या मालकी हस्तांतरणाबाबतच्या नोंदी संबधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून त्वरीत अद्ययावत करून घेण्याची जबाबदरी संबधित पशुपालकाची राहील. ग्रामपंचायतीमध्ये पशुच्या विक्री किंवा परिवर्तनाचा दाखला देतांना पशुधनाची ईअर टॅगिंग झाल्याशिवाय तो देण्यात येवू नये. दाखल्यावर ईअर टॅगचा क्रमांक नमूद करण्यात यावा, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



# पुणे विभागीय भरारी पथकाकडून ११ लाखाहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्कच्या विभागीय भरारी पथकाने ब्रम्हा सनसिटी जवळील, एफ प्लाझा बिल्डींगचा गाळा क्र. जी ५५, वडगाव शेरी मध्ये छापा घालून परदेशी बनावटीच्या मद्यासह ११ लाख ५४ हजार ५२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

उच्च प्रतीच्या परदेशी बनावटीच्या आयात विदेशी मद्याच्या वेगवेगळया ब्रॅण्डच्या व क्षमतेच्या २६ सीलबंद बाटल्या तसेच एक होंडा कंपनीची अमेझ मॉडेलची चारचाकी कार तसेच एक होंडा कंपनीची क्टिव्हा दुचाकी वाहन व मोबाईल फोन असा एकूण ११ लाख ५४ हजार ५२५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यामध्ये एका इसमाला अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील इतर इसमांचा शोध सुरु आहे.

सदर कारवाईमध्ये विभागीय भरारी पथक, पुणे विभाग, पुणे यांचे सह निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क ए विभागाचे निरीक्षक वसंत कौसडीकर यांच्या पथकांचा सहभाग होता. गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक नरेंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक व्ही.एम.माने करीत आहेत.

अवैध दारु निर्मिती, वाहतूक व विक्री व्यवसायाशी संबंधीत माहिती निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने करण्यात येत आहे.

# केवळ शंभर रुपयांत करा मेट्रोचा दिवसभर अमर्यादीत प्रवास

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात मेट्रोचे दोन मार्ग सुरु झाले आहेत. नेहमी वाहतूक कोडींत अडकणारे पुणेकर मेट्रो प्रवाशाला भरभरुन प्रतिसाद देत आहेत. पुणेकर मेट्रोने प्रवास करण्यास प्राधान्य देत आहेत. पुणे मेट्रो सिव्हिल कोर्ट ते पिंपरी चिंचवड आणि वनाज ते रामवाडी या मार्गांवर मेट्रो धावत आहेत. पुणेकरांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे मेट्रो प्रशासनही नवनवीन सुविधा देण्याचा प्रयत्न करत आहेत. आता पुणे मेट्रोने दैनंदिन पासची सुविधा निर्माण केली आहे. त्यानुसार दिवसभरात केवळ शंभर रुपयांत दोन्ही मार्गांवर अमर्यादीत प्रवास करता येणार आहे. त्यामुळे पुण्यातून पिंपरी चिंचवड आणि पिंपरी चिंचवडमधून पुण्यात येणाऱ्या प्रवाशांची चांगली सुविधा होणार आहे.

मेट्रोने दर महिन्याला लाखो पुणेकर प्रवास करत आहेत. मार्च महिन्यात २२ लाखांपेक्षा जास्त लोकांनी मेट्रोने प्रवास केला. पिंपरी-चिंचवडमधून पुणे स्टेशन, येरवडा, वनाजपर्यंत मेट्रोने जात येते. या मार्गावर रस्ते मार्गाने जाताना तास, दोन तासांचा वेळ जातो. परंतु मेट्रोने जवळपास अर्धा तासांत प्रवास होते. यामुळे मेट्रोने प्रवास करण्यास पुणेकर प्राधान्य देऊ लागले आहे. त्यामुळे मेट्रोकडून ऑनलाइन आणि ऑफलाइन तिकीट सुविधा, ॲप, मेट्रो स्थानकावर मशीनच्या माध्यमातून तिकीट दिले जात आहे. स्मार्ट कार्ड, मासिक पास मेट्रोकडून प्रवाशांना दिला जात आहे. आता त्यासोबत प्रवाशांना शंभर रुपयांना दैनंदिन पासची सुविधा सुरु केली आहे. त्यामध्ये त्या दिवसभरात अमर्यादीत प्रवास करता येणार असल्यामुळे प्रवाशांचा आर्थिक फायदा होणार आहे. विशेष म्हणजे ही पास दोन्ही मार्गांवर वापरता येणार आहे. सकाळी सहापासून रात्री दहा वाजेपर्यंत या पासची वैधता राहणार आहे.

# महाराष्ट्राचा मॅग्नेट प्रकल्प फुलशेतीसाठी वरदान - अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार

**पुणे । प्रतिनिधी**

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ग्री बिजनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राज्यातील फुलशेतीसाठी वरदान असून हा देशातील एक यशस्वी प्रकल्प आहे, असे राज्याचे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार म्हणाले.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत के. एफ. बायोप्लांट व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १६) आयोजित फुले पिक उत्पादने व सुगी पश्चात संबंधी कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, राष्ट्रीय सुगी तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, उपसंचालक राजेंद्र महाजन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक माऊली दाभाडे, के. एफ. बायोप्लांटचे सरव्यवस्थापक आशिष फडके, आयसीएआर चे शास्त्रज्ञ डॉ.गणेश कदम, गणेश खिंड कृषी केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मोहन शेटे, डॉ.विष्णु गराडे, फूल उत्पादक शेतकरी आदी उपस्थित होते.





फुल शेतीमध्ये मूल्य साखळी विकसित होण्याची आवश्यकता असून यामुळेच फुलांचा समावेश मॅग्नेट प्रकल्पात केल्याचे सांगून श्री अनुपकुमार म्हणाले, तरुण फुल उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्टार्टअपच्या माध्यमातून या संधीचा फायदा घेतला पाहिजे. फुल शेतीमध्ये महाराष्ट्र राज्य हे एक अग्रेसर राज्य म्हणून पुढे आले असून नांदेड, धाराशिव आदी जिल्ह्यामध्ये फुल शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था हे फुल शेतीच्या मार्गदर्शनातील महत्वाची संस्था आहे, असेही ते म्हणाले.

श्री. कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्प बाबतची विस्तृत माहिती सादर करून फुल शेतीसाठी प्रकल्पाचे महत्त्व विषद केले. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील शेतकऱ्यांनी मूल्य साखळी विकसित करण्यासाठी जास्तीत जास्त प्रस्ताव सादर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.फलोत्पादन व फुल शेतीसाठी मुदत कर्ज व खेळते भाग भांडवलासाठी मॅग्नेट प्रकल्पाच्या एफआयएल घटकांतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा फायदा फुल उत्पादक शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. अमोल यादव यांनी केले. संरक्षित फुल शेती बाबत के.एफ. बायोप्लांटचे श्री. फडके, फुल शेती लागवड याबाबत आयसीएआरचे शास्त्रज्ञ डॉ. कदम यांनी व फुलांची काढणी व्यवस्थापन व निर्यात याबाबत पंडित शिकारे आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये सर्व उपस्थित उत्पादक शेतकऱ्यांना सोएक्स फ्लोरा या फुलाची निर्यात करणाऱ्या कंपनीच्या प्रक्षेत्रास भेट देऊन त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या प्री कुलिंग,कोल्ड स्टोरेज ,पॅक हाऊस, फुलाची काढणी व विपणन या संदर्भात कंपनीचे संचालक नरेंद्र पाटील व सरव्यवस्थापक धनंजय कदम यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी तयार करण्यात आलेल्या 'फूल पीक माहिती पुस्तिकेचे' प्रकाशनही यावेळी करण्यात आले. कार्यशाळेस इंडिका फ्रेशचे पंडित शिकारे, मॅग्नेट प्रकल्पाचे कैलास कुंभार, नितीन पाटील, चेतन भक्कड, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे अधिकारी, कर्मचारी व राज्यातील फुल उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# शहीद कर्नल वैभव काळे यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**पुणे । प्रतिनिधी**

शहीद कर्नल वैभव अनिल काळे (निवृत्त) यांच्या पार्थिवावर आज पुणे कॅन्टोन्मेंट मुक्तीधाम स्मशानभूमी (धोबीघाट) येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलाच्या जवानांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून तसेच अंतिम बिगुल वाजवून शहीद जवानास मानवंदना दिली.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शहीद कर्नल वैभव काळे यांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली. भारतीय सैन्याच्यावतीने दक्षिण कमांडचे चीफ ऑफ स्टाफ मेजर जनरल आर. एस. सुंदरम यांनी पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली. शहीद कर्नल वैभव काळे यांचा मुलगा वेदांत आणि मुलगी राधिका यांनी पार्थिवावर





अंत्यसंस्कार केले. याप्रसंगी वैभव काळे यांची आई रचना काळे, पत्नी अमृता काळे, भाऊ विंग कमांडर अक्षय काळे आणि सासरे कर्नल विवेक खैरे (नि.) उपस्थित होते.

माजी लष्कर उपप्रमुख लेफ्टनंट जनरल नोबेल थंबुराज (नि.), सैनिक कल्याण विभागाचे संचालक ब्रिगेडिअरराजेश गायकवाड (नि.), उपसंचालक लेफ्टनंट कर्नल आर. आर. जाधव (नि.), उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे देवकाते, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल एस. डी. हंगे(नि.), लष्कराचे विविध आजी,माजी अधिकारी,विविध विभागांचे अधिकारी आणि नागरिकही शाहिद काळे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी उपस्थित होते.

सियाचीन ग्लेशियर, कारगीलजवळील द्रास, संयुक्त राष्ट्र शांतिसेनेत काँगो, ईशान्य भारत येथील सेवांसह पठाणकोट लष्करी तळावरील हल्ल्यावेळी तुकडीचे नेतृत्त्व केलेले कर्नल (निवृत्त) वैभव अनिल काळे (वय ४६) यांना संयुक्त राष्ट्राचे निरीक्षक म्हणून गाझामध्ये सेवा बजावत असताना वीरमरण आले.

कर्नल काळे २००० मध्ये 'एनडीए' आणि त्यानंतर 'आयएमए' मार्फत लष्कराच्या पायदळात रुजू झाले. ११ जम्मू-काश्मीर रायफल्स या तुकडींतर्गत त्यांनी याआधी विविध आघाड्यांवर सेवा दिली. याच तुकडीचे त्यांनी कमांडिंग ऑफिसर म्हणून नेतृत्वही केले होते. २०२२ मध्ये त्यांनी लष्करातून स्वेच्छानिवृत्ती घेतली.

त्यानंतर त्यांनी संयुक्त राष्ट्र सरचिटणीसांतर्गत 'यूएनडीएसएस'मध्ये सेवा सुरू केली. त्यांचे पहिलेच पोस्टिंग गाझा पट्टीत राफा येथे होते. 'हमास' विरुद्धच्या युद्धात इस्रायलकडून राफावर भीषण बॉम्बवर्षाव व गोळीबार सुरू होता. तिथेच गेल्या महिन्यात १२ एप्रिलला वैभव काळे यूएन निरीक्षक म्हणून रुजू झाले होते. सोमवारी त्यांना वीरमरण आले.

# यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी ब्लॉक

**पुणे । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत पुणे वाहिनीवर कि.मी. क्र. २७/०० व कि.मी. क्र. ५५/०० येथे १८ व १९ मे २०२४ रोजी गॅन्ट्रीच्या तांत्रिक तपासणी व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार असून पुणे वाहिनीवरील सर्व प्रकारच्या वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

पुणे वाहिनीवर १८ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. या कालावधीत द्रुतगती मार्गावरील सर्व वाहने शेडूंग, खोपोली मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ येथून पुण्याकडे वळविण्यात येणार आहेत. तसेच १९ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत वाहतूक पूर्णपणे बंद करून द्रुतगती मार्गावरील सर्व वाहने कुसगाव पथकर स्थानकावरुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ येथून देहूरोड मार्गे पुण्याकडे वळविण्यात येणार आहे.

या अनुषंगाने वाहनचालकांनी प्रवासाचे नियोजन करावे, या कालावधी दरम्यान द्रुतगती मार्गावरील वाहनचालकांना अडचण असल्यास त्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी ९८२२४९८२२४ किंवा महामार्ग पोलीस विभागाच्या ९८३३४ ९८३३४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कळविले आहे.

## पुणे-मुंबई प्रवास करण्यापूर्वी गाड्या चेक करा, अनेक गाड्या रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-मुंबई आणि मुंबई-पुणे प्रवास अनेक लोक करतात. दोन्ही शहरात नियमित प्रवास करणाऱ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे. पुणे-मुंबई प्रवाशासाठी एक्स्प्रेस वे असला तरी रेल्वे प्रवाशाला अनेक जण प्राधान्य देतात. त्यामुळे या दोन्ही शहरांना जोडणाऱ्या गाड्या नेहमी भरुन जातात. आता काही दिवसांसाठी काही गाड्या रद्द करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. पुणे, मुंबईला जाणारी डेक्कन क्वीन, इंटरसिटी आणि प्रगती एक्स्प्रेस काही दिवसांसाठी रद्द केली आहे. सीएसएमटीवरील कामांमुळे रेल्वे प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवर फलाट विस्ताराचे काम करण्यात येणार आहे. फलाट क्रमांक १० आणि ११ विस्तारीकरण करण्यात येणार आहे. या कामांमुळे पुणे ते मुंबई दरम्यान धावणारी डेक्कन क्वीन दोन दिवस तर प्रगती सहा दिवस रद्द करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. तसेच काही गाड्या सीएसएमटी स्थानकाऐवजी दादरपर्यंत धावणार आहेत. त्यामुळे पुणे-मुंबई प्रवास करणाऱ्यांची काही दिवस गैरसोय होणार आहे.

रद्द केलेल्या गाड्या
पुणे मुंबई पुणे प्रगती एक्स्प्रेस (२८ मे ते २ जून )
पुणे मुंबई इंटरसिटी एक्स्प्रेस( ३१ ते २ जून)
पुणे मुंबई पुणे डेक्कन एक्स्प्रेस (१ व २ जून)
पुणे मुंबई पुणे डेक्कन क्वीन एक्स्प्रेस १ व २ जून
कुर्ला मडगाव कुर्ला (१ व २ जून)

# मतदाननंतर सात दिवसातच युगेंद्र पवार ॲक्टिव्ह मोडमध्ये

**बारामती । प्रतिनिधी**

अजित पवारांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयात दाखल झालेत. अजित पवारांच्या टीकेला युगेंद्र पवार यांनी उत्तर दिलं आहे. बारामतीतील मतदान ७ मेला झाल्यानंतर ते दिसणार नाहीत. परदेशात जातील, अशी टीका मध्यंतरी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती. या टीकेला युगेंद्र पवार यांनी उत्तर दिलं आहे. मी बारामतीचाच आहे. जरी बाहेर कुणाला जायचे असेल तर त्याच्यात काही गैर नाही. गेली चार वर्षे दर सोमवार ते गुरुवारी मी बारामतीत असतो. लोकांशी संपर्क वाढल्यामुळे लोकं मला भेटतात, असं म्हणत युगेंद्र पवार यांनी अजित पवारांच्या टीकेला उत्तर दिलं आहे.

राज्यात चर्चेत असणाऱ्या मतदारसंघापैकी एक असणाऱ्या बारामती लोकसभा मतदारसंघाची मतदान प्रक्रिया पार पडली आहे. त्यानंतर विविध घडामोडी घडत आहे. मतदानाच्या सात दिवसांनंतरच अजित पवारांचे पुतणे युगेंद्र पवार ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळतंय. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या



कार्यालयात आज युगेंद्र पवार आहेत. इथे ते लोकांच्या भेटीगाठी घेत आहेत. अचानक पक्ष कार्यालयाला भेट का दिली? यावर युगेंद्र पवार यांनी भाष्य केलं. जेव्हा मी सुप्रिया सुळेंच्या प्रचारासाठी फिरत होतो. तेव्हा लोक अनेक प्रश्न घेऊन आमच्याकडे येत होती. त्यात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. ते सोडवण्यासाठी आणि इतर अडचणी सोडवण्यासाठी लोकांना भेटण्याकरीता मी पक्षाच्या कार्यालयात आलो आहे, असं युगेंद्र पवार यांनी म्हटलं.

बारामतीतील ईव्हीएम मशीन ज्या खोलीत आहेत. त्या खोलीचा सीसीटीव्ही ४५ मिनिटे बंद होता, असा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला आहे. यावरही युगेंद्र पवार यांनी भाष्य केलं आहे. ही खुप गंभीर गोष्ट आहे. लोक अगोदरचं ईव्हीएमवर शंका व्यक्त करीत आलेत. लोकांच्या शंका दूर करण्यासाठी निवडणूक आयोग आणि यंत्रणेने अधिक काळजी घेतली पाहिजे. एक तास हे बंद असणं खूप चुकीचं आणि गंभीर आहे, असं युगेंद्र पवार म्हणाले.

## महिलेस गुंगीचे औषध देऊन काढले अश्लिल फोटो, ब्लॅकमेल करून १५ लाख उकळले

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील एका महिलेबाबत परिचित व्यक्तीकडूनच फसवणूक झाली आहे. घरावर केलेली काळी जादू काढण्याच्या बहाण्याने घरात घुसून महिलेला आणि लहान मुलीला गुंगीचे सरबत पिण्यास दिले. महिला बेशुद झाल्यानंतर तिचे अश्लील फोटो काढून तिला ब्लॅकमेल करून १५ लाख ३० हजार रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार १४ डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत वानवडी परिसरातील रहेजा गार्डन सोसायटीत घडला आहे. याप्रकरणी वानवडी पोलिसांनी वेगेवगळ्या कलमांतर्गत उत्तर प्रदेशातील दाम्पत्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत २८ वर्षीय महिलेने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून कृष्णनारायण तिवारी (वय-३०) अंतिमा कृष्णनारायण तिवारी (दोघे रा. रामभवन तिवारी, शक्तिनगर, पटवालिया गोंडा, उत्तर प्रदेश) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार आणि आरोपी दाम्पत्य ओळखीचे आहेत. आरोपींनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन तुमच्या घरावर काळी जादू झाल्याचे सांगण्यात आले. काळी जादू नष्ट करतो, असे सांगून आरोपी पुजेसाठी फिर्यादी यांच्या घरी आले. त्यांनी महिलेला व त्यांच्या लहान मुलीला पिवळ्या रंगाचे कडू चव असलेले गुंगी आणणारे सरबत पिण्यास दिले. सरबत पिल्यानंतर दोघी मायलेकी बेशुद्ध झाल्या. त्यानंतर आरोपीने त्यांचे कपडे काढून मोबाईलमध्ये त्यांचे अश्लील फोटो काढले. हे फोटो फिर्यादीच्या मोबाईलवर पाठवले होते.दरम्यान, हे फोटो कॉन्टॅक्ट लिस्टमधील सर्वांना पाठवण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादी यांना ब्लॅकमेल करुन वेळोवेळी पैशांची मागणी केली. पैसे दिले नाही, तर फिर्यादी व मुलीला जीवे मारण्याची धमकी देखील दिली. महिलेने धमकीला घाबरून वेळोवेळी ऑनलाईन पैसे पाठवले. आरोपींनी महिलेच्या घरातील सोन्याचे दागिने व कॅमेरा असा एकूण १५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल नेऊन फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे करीत आहेत.